cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८४ | रविवार दि.१४ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


## संपादकीय

### शेतकऱ्यांप्रती बोटे मोडण्यापेक्षा प्रोत्साहन द्या

सध्या टोमॅटोच्या दरवाढीची चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे टोमॅटोच्या दरवाढीने ग्राहकांच्या विशेषत: महिला वर्गाच्या कपाळावर चिंतेच्या आठ्या उमटल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळणार, टोमॅटो उत्पादक शेतकरी 'गब्बर' होणार, अशा चावडी गप्पांना उधाण आले आहे.

### सात राज्यांमधील पोटनिवडणुकीत इंडिया आघाडीची सरशी

नवी दिल्लीः सात राज्यांतील १३ जागांवर झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांचे निकाल स्पष्ट झाले आहेत. इंडिया आघाडीने १३ पैकी १० जागा जिंकत भाजपला चांगलाच झटका दिला आहे. या पोटनिवडणुकीत भाजपला पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडमध्ये जोरदार झटका बसला. यामध्ये काँग्रेस आणि तृणमूलने प्रत्येकी ४ जागा मिळवल्या आहेत. भाजपला २ तर आम आदमी पक्ष, द्रमुक आणि अपक्षांना प्रत्येकी एक जागा मिळाली आहे. पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची जादू कायम आहे. तर हिमाचल प्रदेशात मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांनी आपली पकड कायम ठेवली आहे.

## शाळा, कॉलेज परिसरात एनर्जी ड्रिंक विकण्यास बंदी!



मुंबई । प्रतिनिधी

तरुण वर्गात दिवसेंदिवस एनर्जी ड्रिंकच्या नावाखाली कॅफेनयुक्त थंड पेय सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. या पेयामुळे आरोग्याला मोठा धोका निर्माण होत आहे. शाळा परिसरात एनर्जी ड्रिंकची सहज विक्री होत असल्याने शाळेतील मुलांना ते सहज उपलब्ध होत आहे. राज्यामध्ये शाळा परिसरातील कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी आणा, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली. आमदार सत्यजीत तांबेंनी ◀◀ पान २ वर

# शेतकऱ्यांचा अंत पाहू नका, अफगानी कांदा थांबवा

## किसान सभेची पंतप्रधान मोदींकडे मागणी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**राज्यातील कांदा उत्पादकांचे कंबरडे मोडण्याचे काम राज्य सरकार आणि केंद्र सरकार करत आहे. ४० टक्के निर्यातशुल्क, निर्यातबंदी, नाफेडचा भ्रष्टाचार यातून कांदा उत्पादक शेतकरी अद्यापही सावरला नाही. तोच पुन्हा एकदा सरकारचे धोरण शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. अमृतसर अन् दिल्लीच्या बाजरपेठेत अफगाणी कांदा उतरला आहे. तो राज्याच्या कांदा बाजार पेठेत येण्याची शक्यता आहे. यावरून किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे. तसेच अफगाणी कांदा रोखण्यासाठी पंतप्रधानांनी आपली ५६ इंचाची छाती वापरावी असे म्हटले आहे.**

केंद्र आणि अफगाणिस्तानमध्ये झालेल्या



करारामुळे अमृतसर अन् दिल्लीच्या बाजरपेठेत अफगाणी कांदा उतरला आहे. अफगाणी कांद्याचे दर हे भारतीय कांद्यापैक्षा कमी असल्याचे त्याला उठाव अधिक आहे. सध्या भारतात कांद्याचे दर ४० ते ५० रुपये किलो असून अफगाणिस्तानचा कांदा , २८ ते ३० रुपये किलो भावाने मिळत आहे. यामुळे दिल्लीतील खासगी व्यापाऱ्यांकडून थेट अफगाणिस्तानहून पाकिस्तानमार्गे कांदा भारतात आणला जात आहे. तसेच भारताच्या कांद्याच्या

### व्यापारी करारामुळे अफगानी कांदा भारतात

दोन देशांमध्ये झालेल्या व्यापारी करारामुळे अफगाणिस्तानचा २०० टन कांदा भारतात दाखल झाला आहे. ४० टनाप्रमाणे पाच ट्रकमधून २०० टन कांदा दिल्लीसह अमृतसरमधील बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झाला आहे. तर पाकिस्तानमार्गे वाघा बॉर्डर पास करून कांदा भारतात दाखल असून तो थेट ग्राहकांना २६ ते ३२ रुपये किलो भावाने दिला जात आहे.

मानाने अफगाणी कांदा परवडणारा असल्याने तो कांदा व्यापाऱ्यांना परवडणारा आहे. तर सध्या अमृतसर अन् दिल्लीच्या बााजरपेठेत असणारा कांदा नाशिकसह इतर ठिकाणच्या बाजार पेठेत उतरण्याची शक्यता आहे. तर यामुळे ◀◀ पान २ वर

# बीड विधानसभेत सर्वच उमेदवारांचा मुस्लिम मतांवर डोळा

## ओबीसी समाजाची भुमिका ठरणार निर्णायक; नेमकी साथ कोणाला मिळणार?














**बीड । विशेष प्रतिनिधी**

**लोकसभा निकालानंतर बीड जिल्ह्यात राजकीय चित्र पालटणार असल्याचे संकेत असून बीड विधानसभा मतदार संघात मुस्लिम समाजाच्या मतांकडे सर्वच उमेदवारांच्या नजरा आहेत. तर ओबीसी समाजाची भुमिका निर्णायक ठरणार असून मतांच्या रुपात नेमकी साथ कोणाला दिली जाणार आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मराठा समाजाची दोन ते तीन उमेदवार उभे राहणार असल्याने मराठा समाजाच्या मतांची विभागणी अटळ आहे. तर दुसरीकडे दोन्ही क्षीरसागर निवडणुकीच्या रिंगणात असणार आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांची सुध्दा पंचाईत झाली असून नेमकं जावं कोणाकडे हा प्रश्न त्यांच्यासमोर आहे.**

लोकसभा निवडणूक ही यावेळी खूपच चुरशीची झाली असून यात पंकजा मुंडे यांचा पराभव होऊन बजरंग सोनवणे हे विजयी झाले. सोनवणे यांना मराठा विरुध्द ओबीसी वादामुळे खासदारकीची लॉटरी लागली आहे. मुंडे यांचा पराभव ओबीसी समाजाच्या खुपच जिव्हारी लागला आहे. ◀◀ पान २ वर

### भाजपकडून योगेश क्षीरसागरांना लॉटरी लागणार?



महायुतीमध्ये बीड विधानसभा मतदार संघ हा शिवसेनेकडे आहे. मात्र तत्कालीन जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी लोकसभा निवडणुकीत जे केले त्याचा परिणाम सुध्दा जागावाटप करताना होऊ शकतो, असे म्हटले जात आहे. त्यामुळे शिवसेनेला जागा देण्यास पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे हे विरोध करु शकतात, असा अंदाज आहे. तर अशा वेळी बीडची जागा पदरात पाडून लोकसभेतील कामाचे बक्षीस म्हणून योगेश क्षीरसागरांना संधी दिली जाण्याची दाट शक्यता आहे. अशा वेळी जयदत्त क्षीरसागर माघार घेतील अशी चर्चा असून बीडमधील ५०– ६० हजार ओबीसी त्यांच्या पाठीशी राहील, असेही म्हटले जात आहे.

### मराठवाड्यासाठी तीन दिवस येलो अलर्ट

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यभरात ठिकठिकाणी पावसाने हजेरी लावली असून मध्य महाराष्ट्र व कोकणात मुसळधार पाऊस झाला. दरम्यान, पुढील तीन दिवस मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा इशारा प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. १६ जुलैपर्यंत मराठवाड्यात मुसळधार पावसाची शक्यता असून बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम सरींच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाने मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांना पुढील तीन दिवस पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. प्रादेशिक हवामान केंद्र मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार ◀◀ पान २ वर

### गणेशोत्सवात मिळणार 'आनंदाचा शिधा'

पुणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्रातील रेशनकार्ड धारक सर्व नागरिकांना 'आनंदाचा शिधा' वाटप करण्यात येणार असा ठराव मांडला होता. त्यानुसार ११ मार्च रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत गुढीपाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'आनंदाचा शिधा' वितरणाचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर आता गणेशोत्सवातही राज्य सरकारकडून आनंदाचा शिधा वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे शिधापत्रिका धारक नागरिकांचा ◀◀ पान २ वर

## लोकसभेप्रमाणे विधानसभेला होणार नाही

### शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांचा विश्वास; निवडणुक लढवण्यावर ठाम

**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टर प्रभावी ठरल्याने जी परिस्थिती निर्माण झाली तशी परिस्थिती विधानसभा निवडणुकीत होणार नाही. मराठा समाजाचेच जास्त उमेदवार होणार असल्याने समाजाच्या मतांची विभागणी होऊ शकते, असे शिंदे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. तसेच आपण कोणत्याही परिस्थितीत बीड विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचेही ते म्हणाले.**

यावेळी पुढे बोलताना अनिल जगताप म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर कधीही राजकीय चर्चा झालेली नाही. जी चर्चा झाली ती आरक्षणाबाबत अनेक वेळा झालेली आहे. समाजाचा सेवक म्हणून मी त्यांच्यासोबत आहे. सरकारला दिलेले अल्टीमेटम संपल्यावर मनोज दादा आपला निर्णय घेतील. त्यावेळी जो ते निर्णय घेतील त्यावेळी आपला विचार नक्कीच होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. ◀◀ पान २ वर

## आ.संदिप क्षीरसागरांनी बीड शहराचा विकास रोखला

### शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांचा गंभीर आरोप



**बीड । प्रतिनिधी**

संदिप क्षीरसागर हे बीड मतदार संघाचे आमदार आहेत, त्यांनी बीड शहरासह मतदार संघाचा विकास करायला हवा, मात्र ते सध्या विकास कामे अडवण्याच्या तंद्रीत असून त्यांच्यामुळे बीड शहरातील विकास रोखला गेला असल्याचा आरोप शिंदे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल जगताप ◀◀ पान २ वर

#### स्मशानभुमिची जागा हडप करण्याचा डाव

बीड शहराला एकच स्मशानभुमी आहे. या जागेची चर्तुसिमा बदलण्यात आली असून स्मशानभुमीच्या चौहुबाजूची जागा हडपण्याचा डाव आहे. हा प्रकार सलिम ट्रेसर आणि गुट्टे यांच्या काळात करण्यात आला असल्याचे यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले.

**धोंडराई येथील विकासकामे तपासण्यासाठी तीन समित्यांची स्थापना**

## रोहयो घोटाळाः समित्यांवर आपला विश्वास नाही–ॲड.अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**



**जन आंदोलनाने धोंडराई तालुका गेवराई येथील ग्राम पंचायतच्या चालू असलेल्या अनागोंदी कारभारा संदर्भात आणि काही कामात संदर्भात आवाज उठवल्यानंतर पंचायत समिती, गेवराई जागी झाली असून घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी तीन वेगवेगळ्या समित्यांची स्थापना केली आहे. मात्र या समित्यांवर आपण समाधानी नसून वरिष्ठ पातळीवरून आपण समित्या नियुक्त करायला लावू, असे जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम.** ◀◀ पान २ वर

## सत्तेत नसल्याने निवीदा प्रक्रिया झालेल्या कामांमध्ये खोडा–खुर्शिद आलम

**बीड । प्रतिनिधी**



बीडमध्ये स्वच्छ व सुसज्ज अशी भाजी मंडई व्हावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर, गेल्या दोन वर्षांपासून शर्थीचे प्रयत्न करत आहेत. शहरात दोन ठिकाणी भाजी मंडईच्या कामाला ५ कोटींचा सन २०२२ मध्येच निधी मंजूर होऊन निवीदा जाहीर झाली होती. परंतु सत्तांतर झाल्यामुळे या कामांना सरकारने स्थगिती दिली आणि याबाबत आता

### सत्तांतरामुळे भाजी मंडईच्या कामात आलेल्या स्थगिती विरोधात आ.संदीप क्षीरसागर कोर्टात

आ.संदीप क्षीरसागर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून हे प्रकरण कोर्टात सुरू आहे. आम्ही आणि आमचे नेतृत्व आ.संदीप क्षीरसागर विकास कामांच्या बाबतीत तत्पर आहोत ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | २,२९० | २,२९० | २,२९० |
| ज्वारी/हायब्रिड :७८.५० क्विंटल | २,००० | २,८३१ | २,४१४ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,८०१ | ८,८०१ | ८,८०१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ७,०५१ | ७,०५१ | ७,०५१ |
| बाजरी: ८.५० क्विंटल | २,४८० | २,८०० | २,६४६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ४,३०० | ४,३०० | ४,३०० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,००० | ६,५०० | ५,७०० |

# सरकारला दिलेला अल्टिमेटम संपला

## जरांगे पाटील काय भुमिका घेतात याकडे लक्ष, मंत्री शंभुराज देसाई म्हणतात शासनाचे प्रयत्न सुरू

**जालना । प्रतिनिधी**



**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला १३ जुलैपर्यंतची वेळ दिली होती. परंतु ही वेळ शनिवारी संपली असून सरकारने शब्द न पाळल्याने जरांगे पुढे काय भूमिका घेतात, याकडे आता लक्ष लागले आहे.**

सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणीसह हैदराबाद गॅझेट, नागपूर गॅझेट, मुंबई गॅझेट लागू करण्याची मनोज जरांगे यांची मागणी आहे. हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात ◀◀ पान २ वर

### जरांगेंना मुख्यमंत्र्यांवर विश्वास

मनोज जरांगेंच्या अल्टिमेटमबद्दल बोलताना शंभुराज देसाई म्हणाले की, मनोज जरांगेंनी थोडासा संयम बाळगला पाहिजे. माझी त्यांना विनंती आहे, ते सातत्याने म्हणत आहेत की माननीय मुख्यमंत्र्यांवर त्यांना विश्वास आहे. मुख्यमंत्र्यांनी मला नेहमीचे आदेश दिलेले आहेत की एकही दिवस वाया न घालवता याबाबतीतले काम चालू ठेवा. दोन–तीन आठवडे अधिवेशनात गेले, सोमवारपासून रोजच्या रोज आमचा याबाबतीत काम करण्याचा प्रयत्न आहे, असा विश्वास देसाईंनी बोलून दाखवला.

### हरकतींची छाननी सुरू

सगे सोयरे संदर्भात ड्राफ्ट नोटिफिकेशन आपण काढलेला आहे, आठ लाखांपेक्षा जास्त ऑब्जेक्शन हरकती आलेल्या आहेत, त्यानंतरसुद्धा शुक्रवारच्या बैठकीत याबाबतीत लीगल ओपेनियन कायदेशीर पद्धतीने लोकांनी दिलेले आहेत त्या सगळ्या बाबतीतली छाननी आमच्या विभागामार्फत सुरू आहे.






cmyk

२ राज्य लोकतंत्र संपादकीय.... रविवार दि.१४ जुलै २०२४

## अग्रलेख

# शेतकऱ्यांप्रती बोटे मोडण्यापेक्षा प्रोत्साहन द्या

सध्या टोमॅटोच्या दरवाढीची चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे टोमॅटोच्या दरवाढीने ग्राहकांच्या विशेषत: महिला वर्गाच्या कपाळावर चिंतेच्या आठ्या उमटल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळणार, टोमॅटो उत्पादक शेतकरी 'गब्बर' होणार, अशा चावडी गप्पांना उधाण आले आहे. दुसरीकडे जिओ कंपनीने तसेच एअरटेल व अन्य कंपन्यांनी आपल्या ग्राहक सेवेतील मोबाइल सेवा महाग केलेली असताना त्याविषयी फारसा गाजावाजा झालेला नाही. मोबाइल कंपन्यांच्या दरवाढीकडे कानाडोळा करून अंबानी पुत्राच्या विवाहाच्या, तेथील नृत्याच्या, शाही बडदास्तीच्याच चर्चा अधिक रंगल्या आहेत.

कांदा दरवाढ असो अथवा नुकतीच झालेली टोमॅटो दरवाढ असो, थोडे दर वाढले की, शहरवासीयांच्या कपाळावर आठ्या पडून बळीराजाला मिळणाऱ्या उत्पन्नाचीच अधिक चर्चा सर्वत्र सुरू होते. एका पिकामध्ये कमविणाऱ्या बळीराजाला पुढच्या पाच-सहा पिकांमध्ये गमवावे लागते. वेळ पडल्यास घरातील महिलांचे दागिने अथवा शेतीचा सातबारा बँकेत ठेऊन कर्ज काढावे लागत आहे. शेती हा बदलत्या लहरी हवामानामुळे बेभरवशाचा प्रकार झालेला आहे. काही हजार रुपये तरी आपण घरात अथवा बँकेत सुरक्षित ठेवतो, पण बळीराजाला मात्र आपल्याला ज्यातून हजारो, लाखो रुपये मिळण्याची शक्यता आहे, आशा आहे, अशा कृषीमालाला देवाच्या हवाल्यावर शेतात सोडावे लागत आहे. मुळात दरवाढ झाल्यावर त्या पिकातून विक्री झालेल्या पैशातील किती पैसे बळीराजाच्या खिशामध्ये जातात, हे जाणून घेण्याचीही तसदी कोणी घेत नाही. कर्जबाजारी बळीराजाने आत्महत्या केल्यावर अथवा बळीराजाला सरकारकडून कर्जमाफी अथवा कर्जावरील व्याजमाफी झाल्यास बळीराजाच्या नावाने बोटे मोडणारे शहरवासीयांनी आजवर केवळ एकांगी विचार करत बळीराजाबाबत आपल्या मनामध्ये चुकीचा ग्रह करून घेतलेला आहे. मुळात बाजार समितीमधील भाजी मार्केटमध्ये व्यापारी किरकोळ विक्रेत्यांना ज्या दरामध्ये कृषीमालाची विक्री करत असतो, त्याहून १० ते १५ टक्के अधिक दराने किरकोळ विक्रेता स्थानिक बाजारात थेट ग्राहकांना भाज्यांची, फळांची विक्री करत असतो. किरकोळ बाजारातील फळ भाज्यांचे, पालेभाज्यांचे दर पाहूनच शहरवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची आकडेमोड करत असतात; परंतु ज्यावेळी कृषीमालाच्या दरामध्ये घसरण झालेली असते, त्या पिकासाठी केलेला गुंतवणुकीच्या अर्धा खर्चही निघत नसतो. मजुरी अंगावर आलेली असते. फळभाज्या, पालेभाज्या काढण्याचाही खर्च निघत नसल्याने शेताच्या बांधावर या भाज्या ज्यावेळी फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर येते, त्यावेळी त्या शेतकऱ्याला सहानुभूती दाखविण्यात तसेच त्या शेतकऱ्याच्या परिस्थितीबाबत चर्चा करण्यात दोन सहानुभूतीचे शब्द बोलण्याबाबत शहरातील लोकांना सवड मिळत नसते.

शॉपिंगसाठी मॉलमध्ये गेल्यावर वस्तूंची खरेदी करताना अथवा मॉलमध्ये सिनेमा पाहण्यासाठी महागड्या तिकिटांची खरेदी करताना शहरातील लोक घासाघीस करत नाही. त्यावर जी छापील किंमत असते, ती देऊन महागड्या वस्तू खरेदी करताना खिशाला झळ बसल्यावरही शहरवासीयांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान झळकत असते. मात्र ऊन, वारा, पावसाचा, थंडीचा, वेळीअवेळी जाणाऱ्या विजेचा त्रास सहन करत बळीराजा शेतीमध्ये पीक काढतो, त्या पिकाला दोन पैसे जास्त देण्याची या लोकांची तयारी नसते. कृषीमालाच्या पालेभाज्या, फळभाज्या विकत घेण्यासाठी घासाघीस करताना पाचशे रुपये पॉपकॉर्नसाठी खर्च करणाऱ्या लोकांना धन्यता वाटत असते. कृषीमालाच्या थेट खरेदीविक्रीसाठी सरकारने थेट परवानगी दिली असली तरी ही संकल्पना केवळ कागदोपत्रीच शोभून दिसत आहे. बळीराजाला शेतीमध्ये दिवसभर कष्ट करून त्याच्या शेतातील कृषीमाल विक्रीसाठी थेट शहरामध्ये अथवा शहराच्या उपनगरामध्ये घेऊन येणे शक्य होत नाही आणि यापुढेही ते शक्य होणार नाही. टॉमटोच्या दराची चर्चा करणाऱ्यांनी सध्या पावसाच्या दिवसामध्ये, वाऱ्याच्या उद्रेकामध्ये टोमॅटोची बाग वाचविण्यासाठी काय त्रास सहन करावा लागतो, याची कल्पनाही न केलेली बरी. थोड्याशा वादळवाऱ्यात टोमॅटोची बाग कोसळते. बांबू तूटतात, तारा तुटतात, पुन्हा नव्याने बागेची बांधणी करावी लागते. बांबू, तारा, सुतळीच्या खर्चाबरोबर बागबांधणीसाठी पुन्हा नव्याने मजुरीचा खर्च करावा लागतो. मॉलमध्ये मुक्त हस्ते खर्चाची उधळण करणाऱ्यांनी बळीराजाच्या मालाला थोडीशी किंमत मिळाली तर नाराजीचा सूर न आळविता दोन पैसे तरी बळीराजाच्या खिशात पडतील, या विषयी समाधान व्यक्त करणे आज काळाची गरज आहे.

# वास्तववादी अर्थसंकल्प तयार करा !

## कॅगचे सरकारला खडेबोल, राज्याच्या अर्थव्यवस्थेबाबत व्यक्त केली चिंता

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या तिजोरीवर वाढत्या आर्थिक ताणाचे संकेत देणारी प्राप्ती आणि खर्च यांच्यातील सततची विसंगती अधोरेखित करून, भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक अर्थात कॅगने आपल्या २०२२-२३ या वर्षाच्या महाराष्ट्र राज्य वित्त लेखापरीक्षण अहवालाने राज्य सरकारला वास्तववादी अर्थसंकल्प तयार करण्याची शिफारस केली आहे. हा अहवाल वित्त, अर्थसंकल्पीय व्यवस्थापन आणि खात्यांची गुणवत्ता, आर्थिक अहवाल पद्धती आणि राज्य वित्ताशी संबंधित इतर बाबींचे सिंहावलोकन करण्यात आले आहे.**

नुकतेच राज्यातील महायुतीचे शेवटचे पावसाळी अधिवेशन पार पडले. मागील १० वर्षात राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी सातत्याने राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्याचा एकप्रकारे नवा विक्रम स्वतःच्या नावावर नोंदविला. तसेच प्रथेप्रमाणे अधिवेशनाच्या शेवटी सरकारच्या जमा खर्चाबाबत राज्य सरकारचा ऑडिट रिपोर्ट अर्थात कॅग अहवालही सादर करण्यात आला. या अहवालात राज्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत कॅगने चिंता व्यक्त करत जरा वास्तववादी अर्थसंकल्प सादर करण्याचे खडे बोलही राज्याच्या अर्थमंत्र्यांना सुनावल्याची माहिती कॅगच्या अहवालाद्वारे पुढे आले आहे.

राज्य सरकारने विभागांच्या गरजा आणि वाटप केलेल्या संसाधनांचा वापर करण्याची त्यांची क्षमता लक्षात घेऊन विश्वसनीय गृहितकांवर आधारित वास्तववादी अर्थसंकल्प तयार करावा, असे अहवालात सूचना करण्यात आली आहे. पुरवणी अनुदान/विनियोग तसेच पुनर्विनियोग पुरेशा औचित्याशिवाय प्राप्त झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात अखर्चित राहिल्याबद्दलही अहवालात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. राज्य सरकारने राबविलेल्या अर्थसंकल्पाची कसरत अधिक वास्तववादी असणे आवश्यक आहे, कारण एकूण तरतुदीपैकी १८.१९ टक्के निधी वापरताच आला नाही. वर्षभरात झालेला एकूण खर्च मूळ अर्थसंकल्पापेक्षा सहा टक्के कमी होता आणि पुरवणी अर्थसंकल्प मूळ अर्थसंकल्पाच्या १५ टक्के होता,'' असे अहवालात नमूद करण्यात आले. बचत कमी केली जावी, अनुदान/विनियोजनामधील मोठ्या बचतीवर नियंत्रण ठेवता येईल आणि अपेक्षित बचत ओळखून विनिर्दिष्ट कालमर्यादेत समर्पण केले जाईल याची खात्री करण्यासाठी अर्थसंकल्पाची योग्य अंमलबजावणी आणि देखरेख करण्यासाठी सरकारने एक योग्य नियंत्रण यंत्रणा स्थापन करणे आवश्यक आहे, असे मतही या अहवालाद्वारे व्यक्त केले आहे. या अहवालात राज्याला त्यांच्या गुंतवणुकीबाबतही सल्ला देण्यात आला आहे. सरकार गुंतवणुकीतील पैशाचे चांगले मूल्य सुनिश्चित करण्यासाठी पावले उचलू शकते. अन्यथा, उच्च खर्चावर कर्ज घेतलेले निधी कमी आर्थिक परतावा असलेल्या प्रकल्पांमध्ये गुंतवले जातील, असे त्यात म्हटले आहे. तसेच कॅगने आपल्या अहवालात पुढे म्हटले आहे की, खर्चाचे तर्कसंगतीकरण करण्यासाठी, पुढील स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी, महसूलाचा आधार वाढवण्यासाठी आणि महसूल उत्पन्न निर्माण करणाऱ्या मालमत्तेमध्ये गुंतवणूक करण्यासाठी उपायात्मक उपायांचा अवलंब करून दीर्घकालीन वित्तीय स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने कर्ज पातळीचे निरीक्षण आणि व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याची सूचनाही करण्यात आली.

# प्रा.सत्येंद्र पाटील यांच्या सेवागौरवपुर्ती सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा

**बीड । प्रतिनिधी**

**शिक्षक नेते आदरणीय प्रा.सत्येंद्र पाटील सर हे नियत वयोमानानुसार सौ.के एस.के. महाविद्यालय बीड येथून सेवानिवृत्त झाले आहेत. जुक्ता संघटनेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण व शिक्षक यांच्या प्रश्नांवर आवाज उठवून अविरत कार्य केले आहे.आपल्या प्रदीर्घ सेवेत त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून सेवागौरव समितीच्या वतीने भव्य सेवागौरवपुर्ती सोहळ्याचे आयोजन दिनांक १४ जुलै २०२४ रोज रविवार या दिवशी सकाळी ठीक १०.३० वाजता ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल आशीर्वाद मंगल कार्यालयाच्या पाठीमागे बार्शी रोड बीड येथे करण्यात आले आहे.**



या कार्यक्रमाला बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे,या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी मंत्री अशोकराव पाटील तर विशेष उपस्थिती मध्ये बीड तालुक्याचे आमदार संदीप क्षीरसागर, शिवसंग्रामच्या अध्यक्षा श्रीमती ज्योतीताई मेटे, मा.आ.कैलास दादा पाटील, मा.अभिजित आबा पाटील तसेच राजकीय, सामाजिक,प्रशासकीय व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक प्रमुख मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तरी या कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सेवापूर्ती गौरव सोहळा समितीचे अध्यक्ष प्रा.विजय पवार सर व सर्व सदस्यांनी केले आहे.

# नीरज लाहोटी याचे सीए परीक्षेत यश

**बीड । प्रतिनिधी**



**बीड येथील ओम प्रिंटर्सचे मालक ओमप्रकाश सिकची यांचे भाचे गंगापुर येथील रहिवासी नीरज संजयकुमार लाहोटी हा सीए परीक्षेत उत्तीर्ण झाला. निरजने मोठ्या प्रमाणावर मेहनत घेवून ही सी.ए. परीक्षा चांगल्या गुणाने उत्तीर्ण केली आहे. निरज हा पहिलीपासूनच हुशार आणि मेहनती आहे. त्याच्या मेहनतीला चांगले उज्वल यश प्राप्त झाले आहे.**

यावेळी गंगापूर येथील माहेश्वरी समाजातून, व्यापारी बंधुतून तसेच सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन केले असून बीड येथील जगदीश सिकची, बालाप्रसाद सिकची, ओमप्रकाश सिकची, अशोक सिकची, सौरभ सिकची, शुभम्? सिकची, दर्शन सिकची यांच्यासह बालमुकूंद लड्डा, जुगलकिशोर लड्डा, ब्रिजमोहन लड्डा, अशोककुमार लड्डा, संजय लड्डा, धिरज लड्डा, पवन लड्डा, कृष्णा लड्डा यांनी निरजचे अभिनंदन केले आहे.

# शिवसंग्रामचा रोजगार मेळावा; एकच छताखाली मिळणार ५ हजार तरुणांना नोकऱ्या

## तरुणांनी संधीचा लाभ घ्यावा-मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

**स्व.विनायकराव मेटे यांच्या सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून आणि शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने होत असलेल्या भव्य रोजगार मेळाव्यात एकाच छताखाली राज्यातील ४० नामांकित कंपन्यांत ५ हजार नोकऱ्या उपलब्ध केल्या जाणार आहेत. हा मेळावा बीड येथील आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड येथे दि.१५ जुलै सोमवार रोजी सकाळी ०९ ते ०५ या वेळेत होणार आहे. तरी युवकांनी या मेळाव्यात सहभागी होत या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केले आहे.**



जिल्ह्यातील बेरोजगार तरुणाच्या हाताला काम मिळावे आणि ते रोजगाराच्या दिशेने वळावेत या उदात्त हेतूने स्वर्गीय लोकनेते विनायकराव मेटे यांनी नेहमीच प्रयत्न केले होते. याच धर्तीवर स्वर्गीय विनायकराव मेटे यांचा वारसा पुढे चालवत डॉ. ज्योती मेटे यांच्या संकलापनेतून या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्याचा फायदा जिल्ह्यातील अनेक तरुणांना होणार असून यातून त्यांना चांगल्या कंपन्यांत रोजगार मिळणार आहे. याचा लाभ घेण्यासाठी तरुणांनी या मेळाव्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

## पान १वरून...

### शेतकऱ्यांचा अंत पाहू नका,

राज्यातील कांदा उत्पादकांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. यामुळे नाशिकसह इतर ठिकाणच्या व्यापाऱ्यांनी अफगाणिस्तानच्या कांद्याला परवानगी देऊ नये, अशी मागणी राज्य सरकारसह केंद्राकडे केली आहे. यावरून किसान सभेने केंद्राकडे सलग तीन सिझन कांदा उत्पादक शेतकरी नुकसान सहन करत आहेत. त्यातच केंद्राचे निर्यात धोरणासह अटी व शर्तीमुळे कांद्याचे भाव सतत पडत आहेत. त्यामुळेच राज्यातला कांदा उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरला होता. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आपली नाराजी लोकसभेवेळी मतदानातून व्यक्त केली होती. एकीकडे कांदा उत्पकांमध्ये अद्याप नाराजी असतानाही दुसरीकडे केंद्राचे धोरण शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. केंद्राने केलेल्या करारामुळे अफगाणी कांदा पाकिस्तानमार्गे भारतात येत आहे. तसेच तो अधिक स्वस्त दरात उपलब्ध होत असल्याने कांदा उत्पादक पुन्हा एकदा अडचणीत येणार आहे. कांदा उत्पादकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होणार असल्याचे नवले म्हणाले. तर शेतकऱ्यांना मातीत घालणारे करार का होतात असा सवाल नवले यांनी उपस्थित केला आहे. तसेच शेतकऱ्यांचे हित लक्षात न घेता केंद्राकडून करार करण्यात यावेत अशी मागणी नवले यांनी केली आहे. तर सरकारने आता शेतकऱ्यांचा अंत न पाहता अफगाणी कांदा रोखा. तर पंतप्रधान मोदींनी त्यांची छप्पन इंचची छाती अशी वेळी पुढे करावी अशी टीका नवले यांनी केली आहे. तसेच शेतकरी विरोधी सर्व धोरणे थांबवत कांदा उत्पादकांचे हित लक्षात घेत कांदा निर्यात करा अशीही मागणी नवले यांनी केली आहे.

------------

### मराठवाड्यासाठी तीन

छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, नांदेड जिल्ह्यासह बीड परभणी व हिंगोलीमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. यावेळी वाऱ्याचा वेग ३० ते ४० किलोमीटर प्रतितास राहणार असून ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. बीड, परभणी, हिंगोलीत मुसळधार पावसाची शक्यता राहणार असून, छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, नांदेड, जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

----------

### बीड विधानसभेत सर्वच उमेदवारांची

त्यातून पाच आत्महत्या सुध्दा झाल्या असून पराभवाचा वचपा काढण्याच्या मुडमध्ये ओबीसी असल्याचे चित्र आहे. बीड विधानसभा मतदार संघात मराठा समाजामध्ये जास्त इच्छुक असून या मतदार संघात मुस्लिम मतांकडे दोन्ही क्षीरसागर आणि मराठा उमेदवारांच्या नजरा आहेत. शिंदे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, स्व. विनायक मेटे यांची पत्नी ज्योतीताई मेटे, भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी विधानसभा निवडणुक लढवण्याची तयारी सुरु केली आहे. मस्के यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शहरात भावी आमदार असा त्यांचा उल्लेख कार्यकर्त्यांनी बॅनरमध्ये केला. तसेच इतर नेतेही मोर्चेबांधणी करीत असून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि आ. संदिप क्षीरसागर हे सुध्दा मैदानात उतरणार आहेत. शहरात मुस्लिम समाज जास्त आहे. त्याकडे सध्या सर्वच संभाव्य उमेदवारांचे लक्ष असून मुस्लिम समाजाची मते सर्वांसाठीच महत्वाची ठरणार आहे. ओबीसी समाजाची या मतदार संघात ५० ते ६० हजार मते असून ही मते निर्णायक ठरणार आहेत. कारण मराठा मतांची दोन किंवा तीन उमेदारांमध्ये विभागणी होणार असून त्यातील बरीच मते ही दोन्ही क्षीरसागरांकडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे ओबीसी मते कोणाच्या पारड्यात पडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दोन्ही क्षीरसागरांनी पंकजा मुंडे यांच्या विरोधामध्ये काम केल्याने त्यांना यातील बरीच मते मिळणार नसल्याचे चित्र आहे. तर मराठा उमेदवारांना ओबीसी मतदान करतील अशी सध्या तरी स्थिती दिसत नाही. त्यामुळे ओबीसी समाज नेमका निर्णय काय घेतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-----------

### आ.संदिप क्षीरसागरांनी बीड शहराचा

यांचीही उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना सचिन मुळूक म्हणाले, आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करुन आम्ही ३ कोटी रुपयाचा निधी बीड शहरासाठी रस्ते कामे करण्यासंदर्भात आणला. त्यातून स्वराज नगरमधील रस्ते चकाचक होणार होते. याबाबत प्रशासकीय मान्यता मिळण्याची प्रक्रिया सुरु होती. मात्र आ. संदिप क्षीरसागर यांनी या विकास कामांना न्यायालयाकडून स्थगिती आणली. त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याने बीड शहरातील रस्त्याची कामे खोळंबली आहेत. त्यांना आम्ही रस्त्याची कामे अडवू नका, अशी विनंती केली मात्र त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. बीड शहराच्या विकासासाठी त्यांनी सहकार्याची भुमिका ठेवायला हवी, मात्र ते बीडच्या विकास कामात खोडा घालत असल्याचे यावेळी मुळूक म्हणाले. बीड शहराच्या विकासाचे तिन्ही क्षीरसागरांना देणेघेणे नसून गेल्या दोन वर्षापासून बीडची जनता वेठीस धरण्याचे काम केले जात आहे. शहराला २०-२० दिवसाला पाणी येते, शहरातील मुख्य रस्ते सोडले तर गल्ली आणि कॉलनीतील रस्त्यांची दुरावस्था आहे, शहरात सर्वत्र अस्वच्छता आहे, कर्मचाऱ्यांवर कोणाचाही धाक राहीला नाही त्यामुळे बीडच्या विकासाच्या बाबतीत काहीच केले जात नाही. जनता प्रशासक आणि क्षीरसागरांच्या त्रासाला कंठाळली असल्याचे यावेळी मुळूक म्हणाले. बीडमधील रस्त्यांची अडवलेली कामे आणि स्मशानभुमीसंदर्भात आम्ही मुख्यमंत्री आणि प्रशासनाकडे दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला सचिन मुळूक, अनिल जगताप यांच्यासह तालुकाप्रमुख मकरंद उबाळे, उपजिल्हा प्रमुख संतोष जाधव, अजय जाधव, सुनिल अनभुले, सुनिल सुरवसे आदि उपस्थित होते.

----------------------

### शाळा, कॉलेज परिसरात

मांडलेल्या मुद्द्यावर राज्य सरकारकडून मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी शाळा परिसरात ५०० मीटर अंतरावर कॅफेनयुक्त पेयांच्या विक्रीवर बंदी घालण्याचे जाहीर केले. एनर्जी ड्रिंक्स हा सध्याची तरुणाई आणि लहान मुलांमध्ये आवडीचा विषय आहे. बॉलिवूडचे टॉपचे अनेक हिरो या एनर्जी ड्रिंक्सच्या जाहिराती करतात, ज्यातून हे ड्रिंक्स प्यायल्याने ताजंतवानं राहता येईल, असे सांगितलं जाते. त्यामुळे तरुणवर्ग साहजिकच याकडे आकर्षित होतो. या ड्रिंक्सच्या बॉटल्सवर अनेकदा १८ वर्षांखालील मुलांनी सेवन करु नये, असे लिहिलेले असते. मात्र, तरीही लहान मुलांकडूनही मोठ्या प्रमाणात याचे सेवन केले जाते. हे टाळण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. तरुण वर्गासोबतच लहान मुलेदेखील याकडे आकर्षित होत आहेत. शाळा व महाविद्यालय परिसरात एनर्जी ड्रिंक्स सहज उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. त्याचबरोबर जाहिरातीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात एनर्जी ड्रिंक्सचा प्रसार केला जातो. एनर्जी ड्रिंक्सच्या जाहिरातींवरही सरकारने बंदी घालावी. तसेच शाळा परिसरात कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी घालून योग्य कार्यवाही करावी. याबाबत संबधित अधिकाऱ्यांसोबत एक बैठक घेण्यात यावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली. सत्यजीत तांबेंच्या मागणीवर सभापती नीलम गोऱ्हे यांनी चिंता व्यक्त करीत येत्या १५ दिवसांत बैठक घेण्याचे आदेश संबंधित मंत्री आणि प्रशासनाला दिले. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी शाळा परिसरात ५०० मीटर अंतरावर कॅफेनयुक्त पेयांवर (एनर्जी ड्रिंक्स) तातडीने बंदी घालण्यात येईल. त्याचबरोबर अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करून योग्य कार्यवाही करण्यात येईल, असे आदेश दिले आहेत.

--------------

### लोकसभेप्रमाणे विधानसभेला

बीडमधून मी विधानसभा निवडणूक लढवणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात मी ही निवडणुक धनुष्य बाणावरच लढवणार असल्याचे ते म्हणाले. कुंडलिक खांडे यांच्याविषयी बोलताना जगताप म्हणाले, बीड मतदार संघाची जबाबदारी माझ्यावरही होती, मतदानादिवशी मला कोठेही खांडे म्हणतात तसा प्रकार झालेला दिसून आला नाही. त्यामुळे यातील खरं काय ते त्यांनाच माहित असे जगताप म्हणाले. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांचीही उपस्थिती होती.

---------

### गणेशोत्सवात मिळणार

यंदाचा गणेशोत्सव आणखी उत्साहदायक होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज्य सरकार गणेशोत्सवात ५६० कोटींचा आनंदाचा शिधा वाटणार आहे. याबाबत राज्य सरकारकडून जीआर प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यानुसार तब्बल १ कोटी ७० लाखांहून अधिक शिधापत्रिका धारकांना याचा लाभ मिळणार आहे. या वाटपासाठी निविदा प्रक्रिया २१ ऐवजी ८ दिवसांत पूर्ण करणार आहेत, अशी माहिती मिळत आहे. गणेशोत्सवातील आनंदाचा शिधा वाटप हा १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२४ याकाळात होणार आहे. या शिध्याच्या प्रत्येक संच रूपये शंभरप्रमाणे सवलतीच्या दरात वितरीत केला जाणार आहे. यामध्ये प्रत्येकी १ किलो रवा, चणाडाळ, साखर आणि १ लिटर सोयाबीन तेल देण्यात येणार आहे.

-------------

### सत्तेत नसल्याने निवीदा प्रक्रिया झालेल्या

परंतू आम्हाला सत्तेच्या हुकूमशाही धोरणामुळे वेठीस धरले जात आहे. आणि आम्ही आणलेल्या कामात खोडा आणला जात आहे. असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे शहराध्यक्ष खुर्शिद आलम यांनी म्हटले आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी शहरातील नागरिकांना स्वच्छ भाजीपाला मिळावा. सध्या महात्मा फुले नवीन भाजी मंडई आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील भाजी मंडई याठिकाणी अत्यंत घाणीच्या वातावरणात भाजीपाला विक्री केला जातो. विक्रेते रस्त्यावर बसून विक्री करतात. भाजी मंडई हा नागरी सुविधेच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. शहरातील नागरिकांना स्वच्छ आणि निरोगी वातावरणातील भाजीपाला मिळावा यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी पाठपुरावा केला. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याने १९ एप्रिल २०२२ रोजी वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत शहरातील महात्मा फुले नवीन भाजी मंडई संस्कार विद्यालय परिसर चे नुतनीकरण करण्यासाठी ३ कोटी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील भाजी मंडईचे नुतनीकरण करण्यासाठी २ कोटी रुपये असा शहरातील दोन्ही भाजी मंडईसाठी एकूण ५ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला होता. सदरील कामांचा १४ मे २०२२ रोजी नगरपरिषदेचा ठराव झाला आणि ५ जुलै २०२२ रोजी टेंडर जाहीर झाले. परंतु मध्येच सत्तांतर झाल्यामुळे ६ जुलै २०२२ च्या आदेशानुसार सदरील कामांना महाराष्ट्र सरकारकडून स्थगिती देण्यात आली. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी या कामांना स्थगिती देऊ नये, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्यासोबत अनेकवेळा पत्रव्यवहार केला. परंतु शासनाकडून यावरील स्थगिती कायम ठेवण्यात आली. नागरिकांसाठी अत्यावश्यक असलेले विकासकाम अडून राहिल्यामुळे शेवटी आ.संदीप क्षीरसागर यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने २९ सप्टेंबर २०२३ रोजी सदरील कामांवरील स्थगिती उठविण्याचे आदेश दिले. परंतु स्थगिती उठल्यावर शासनाने १ नोव्हेंबर २०२३ व २० नोव्हेंबर २०२३ रोजी शुध्दीपत्रक काढून या कामांचा निधी दुसर्या कामांना वर्ग केला. दरम्यान न्यायालयाच्या आदेशानुसार आ.क्षीरसागरांच्या प्रस्तावित कामांमध्ये बदल न करण्याचे स्पष्ट आदेश असतानाही हा प्रकार करण्यात आला त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी पुन्हा न्यायालयात धाव घेतली आणि प्रकरण न्यायालयाकडे गेल्यावर लगेचच खोडा आणण्यासाठी सत्ताधारी पक्षाचे जिल्हाप्रमुख यांनी न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे. बीडचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आम्ही तत्पर आहोत सत्तेच्या दुरूपयोगाने आम्हाला अडचणीत आणले तरीही आम्ही न्यायालयीन आणि कायदेशीर मार्गाचा अवलंब करू असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष खुर्शिद आलम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

-----------

### रोहयो घोटाळा: समित्यांवर आपला

देशमुख यांनी म्हटले आहे. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांनी या समित्या नियुक्त केल्या आहेत. या समस्यांमध्ये त्याच तालुक्यात कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे या समित्या तक्रारीला किती न्याय देतील ? हा प्रश्न उपस्थित होत आहे. तरी देखील या समित्यांचा अहवाल आल्यानंतर त्याचा आपण अभ्यास करू. जर चुकीच्या अहवाल आला तर अहवाल देणाऱ्यांवर देखील कारवाई करण्याची मागणी करू, असे ही देशमुख यांनी म्हटले आहे. या समित्यांमध्ये कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग, स्थापत्य अभियांत्रिकी, सहाय्यक विस्तार अधिकारी पंचायत, प्रभारी सहाय्यक लेखा अधिकारी, सहायक कार्यक्रम अधिकारी, ऑपरेटर, तांत्रिक सहाय्यक, अशा वेगवेगळ्या लोकांच्या नियुक्ती आहेत. दुर्दैव असे की, कोणते मुद्दे तपासायचे आहेत, निवेदनात कोणते मुद्दे आहेत, हेच या समितीला गटविकास अधिकाऱ्यांनी सांगितले नाही. त्यामुळे कारभार कशा पद्धतीने चालू आहे, हे स्पष्ट दिसते. त्याचप्रमाणे धोंडराई येथील हा घोटाळा म्हणजे शासनाला दिशा देण्याचे एक काम आहे. त्यामुळे या ठिकाणी कोण काम करत आहे ? अधिकारी कोण आहेत ? याच्याशी आपल्याला काही देणे घेणे नसून धोरणात्मक बदलासाठी एक नमुना म्हणून धोंडराई सह अन्य काही ठिकाणच्या बाबी आपण शासनास सांगणार आहोत. अनेक बाबीवर काम नियमबाह्य रीतीने केलेले आहेत. या बाबी गटविकास अधिकाऱ्यांच्या अधिनस्त काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना माहित आहेत. त्याचप्रमाणे अन्य खात्यांना देखील या बाबी माहीत आहेत. इतकेच नाही तर जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदे मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील या बाबी माहीत आहेत. त्यामुळे या ठिकाणी एक उच्चस्तरीय समिती नियुक्त करून त्याद्वारे चौकशीची मागणी आपण या तीन समित्यांचा अहवाल आल्यानंतर करणार असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना ही एका कायद्यावर आधारित योजना आहे. या कायद्यात अनेक शिक्षा करण्याच्या तरतुदी आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी अधिकारी दोषी सापडतील, त्या ठिकाणी त्यांच्यावर कारवाई होईल. यात कसलीही शंका नाही. मात्र त्यासाठी लढा देण्याचे काम करत असल्याचेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

-----------

### सरकारला दिलेला

मंत्री शंभुराज देसाई यांनी शनिवारी माध्यमांशी बोलताना महत्त्वाची माहिती दिली. शंभूराज देसाई म्हणाले की, जरांगे यांना ज्यावेळी भेटलो होतो तेव्हा त्यांच्याकडे दोन महिन्यांची वेळ आम्ही मागितली होती, परंतु एकचं महिन्यांचा कालावधी त्यांनी दिला. एक महिन्यात त्यांना आम्ही भेटून आल्यानंतर मराठा आरक्षणासंदर्भात एकही दिवस आम्ही वाया घालवलेला नाही. दोन-तीन गोष्टी त्यांनी महत्त्वाच्या मांडल्या होत्या त्यामध्ये सगे सोयऱ्यांची अंमलबजावणी आणि हैदराबाद गॅझेट. या दोन्ही बाबतीत सर्वपक्षीय बैठक मागच्या चार दिवसात मुख्यमंत्र्यांनी घेतली, दुर्दैवाने महाविकास आघाडीने त्या बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यांचे त्याबाबतीत काय म्हणणे आहे हे आम्हाला कळू शकले नाही. बहिष्कार टाकला म्हणून आम्ही काय हातावर हात मारून बसलेलो नाही. रोजच्या रोज आम्ही आढावा घेत आहोत. बैठका घेत आहोत, हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा आग्रह जो जरांगे यांचा आहे यासाठी आमच्या ११ अधिकाऱ्यांची टीम मागील चार दिवसांपासून तेलंगणा गव्हर्मेंटकडे गेलेली होती. ती टीम परत आलेली आहे, मात्र त्यांच्याशी अद्याप चर्चा झालेली नाही. सोमवारी त्यांच्याशी चर्चा होणार आहे त्याबाबतीत पण आम्ही सकारात्मक आहोत. शिंदेंनी जो शब्द दिलेला आहे त्याप्रमाणे लवकरात लवकर आम्ही यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न नक्कीच करू, असे ते म्हणाले.

-------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. १४ जुलै २०२४


## भवानी अर्बन बँकेच्या अध्यक्षपदी मोटे, उपाध्यक्षपदी हन्नान

**गेवराई । प्रतिनिधी**

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी स्थापन केलेल्या व सहकार क्षेत्रात नावाजलेल्या गेवराई येथील भवानी अर्बन बँकेच्या अध्यक्षपदी बप्पासाहेब मोटे यांची तर उपाध्यक्षपदी अब्दुल हन्नान यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांनी त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

भवानी अर्बन बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीसाठी आज बैठक बोलवण्यात आली होती. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, माजी सभापती कुमारराव ढाकणे यांच्यासह भवानी बँकेचे संचालक सर्वश्री दिपक नाही आतकारे, शाम काळे, अनुप मंत्री, लहू ढोबळे, सय्यद हसिबोद्दीन, सुखदेव जाधव, तुकाराम मस्के, भागवत गौंडी, सौ. मंगल खाजेकर, सौ. कुंदा सोलाने आदी उपस्थित होते.बैठकीत अध्यक्षपदी बप्पासाहेब मोटे आणि उपाध्यक्षपदी अब्दुल हन्नान यांच्या नावावर एकमत झाल्यामुळे सर्वानुमते त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहायक निबंधक श्रीमती कदम, मिलिंद देशपांडे यांनी काम पाहिले. यावेळी राजेंद्र वांगे, सुभाष मस्के, अॅड. एस.एच. पाटील, शामराव मुळे,शंकरराव तौर, गणेश वडघणे, शंकरराव पवार, संग्राम आहेर, किशोर कांडेकर, रावसाहेब देशमुख, वसिम सौदागर, विष्णू आडे, वचिष्ठ घमाट, दत्ता संत आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# पालकमंत्र्यांना लोकसभेतले पाप विधानसभेत फेडावे लागणार , खा.बजरंग सोनवणे कडाडले

बीड । प्रतिनिधी

सत्ता पक्षांचे नेते , धनशक्ती , सत्तेचा पुरेपूर वापर , दबाव तंत्राचा वापर करून देखील इथे जनतेने सत्तांध शक्तीचा पराभव करून सर्व सामान्य शेतकऱ्याचे पोरग खासदार केले , मी होऊच नये म्हणून जीवाचे रान आणि आकाश पाताळ एक करताना पालकमंत्र्यांनी जातीवाद आणि दबाव सारखे पाप केले जे विधानसभेत फेडावे लागेल असा दम भरताना सहा मतदार संघात तुतारीचा निनाद होणार असल्याचे सांगितले . नव्या खासदाराचा सत्कार करताना अंबाजोगाई प्रचंड नटली होती , प्रचंड गर्दी उत्साहात बजरंग सोनवणे यांच्या सत्काराला समाज एकवटला .

पालकमंत्री यांनी जे पाप लोकसभेला केले आहे,ते पाप येणाऱ्या विधान सभेला फेडावे लागणार आहेअसे म्हणताना बजरंग सोनवणे यांनी कालच्या सभेत जोरदार प्रहार चढवला .येणाऱ्या काळामध्ये बीड जिल्ह्यामध्ये आपल्या महविकास आघाडीचे सर्व आमदार निवडून अनायचे आहेत,आपण मला खासदार केले अत्ता आपल्या जिल्ह्याचे राहिलेले काम करण्यासाठी कामे करून कशी घ्यायची ते मी बगतो,अश्या शैलीत आपले भाषण केले,माझ्या सहित जिल्ह्यातील सर्व जनतेला त्रास दिला,त्याचा हिशोब अत्ता विधान सभेला होणार आहे,जाती जाती मध्ये तेढ निर्माण करण्याचे



अंबानगरीने केला नव्या खासदारांचा नागरी सत्कार

काम बंद करा, मनोज दादाना मला शिव्या देतात त्यांना पाठीशी कोण घालतंय,त्यांना आवर घाला, असा इशाराही खासदारांनी अप्रत्यक्ष पालक मंत्र्यांना लगावला,आलेल्या सर्व निवेदनाच्या कामाचा पाठपुरावा करून मार्गी लावण्याचे काम करणार आहे, जिल्हा परिषदेच्या शाळेच्या दर्जा वाढवण्याचे काम करू, हारवेस्टर व ऊस तोडणी मजुरांचा दर सारखाच कशा होईल याचा ही प्रयत्न करू,बीड जिल्ह्यातील शेतकऱ्याचे दरडोई उत्पन्न वाढवण्याचे काम मला करायचं आहे, काटा मारून कारखाना चालवणारी अवलाद माझी नाही,आणि मी कटा मारून कारखाना चालवत असेल तर पालकमंत्र्यांनी ३ वर्ष ऊस माझ्या कारखान्याला दिला कसा असा खोचक सवाल केला, आपण वयाने छोटे आहात,टीका करत असताना विचारून करा,माझे अत्ता सुरू झाले आहे,आपले संपत आले आहे, याचाही विचार आपण करावा, असे ठणकावत बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्र्यांना उद्याच्या राजकारणात दोन हात करण्याचे आव्हान दिले .केवळ जातीचे राजकारण करून जर कुणाला सत्ता मिळवायची असेल तर इथले सामान्य मतदार हा कावा पूर्ण होऊ देणार नसल्याचे म्हटले.

### पृथ्वीराज साठे

साठे साहेबांनी आपल्या अंदाजात आजची तारीख ही तेरा साथ आहे,आपण अंबाजोगाई करांची साथ कधीही सोडू नये म्हणून आजची तारीख निवडली आहे,आणि बप्पांच्या हाताने गोर गरीबांचे कामे होवेत,अश्या शुभेच्या दिल्या.

### कालिदास आपेट

आपल्या मराठवाड्यामध्ये सर्वात जास्त भाव खासदारांच्याच कारखान्याने दिला आहे, हार्वेस्टर व ऊसतोड मजूर यांना तोडणीचा भाव सारखाच मिळावा याची मागणी सभागृहात करावी अशी विनंती करून बाप्पांना शुभेच्छा.

### राजेसाहेब देशमुख

देश्यामध्ये व महाराष्ट्र मध्ये राहुल गांधी,शरद पवारसाहेब, उद्धव ठाकरेसाहेब, यांनी प्रचंड मेहनत घेतली. आपण सर्वांनी लोकसभा निवडणुकीमध्ये परिवर्तन केले तसेच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये ही परिवर्तन करायचे आहे.

### प्रचार आणि प्रहार


कालचा आवेश प्रचंड आश्वासक होता बजरंग सोनवणे यांनी अगदी निडर भूमिका मांडताना कार्यकर्त्यांना प्रचंड बळ दिले .अंबाजोगाई मला आई सारखी असून विकासात कसूर आणि कसर सोडणार नसल्याचे त्यांनी म्हटले . सभेत मध्ये बजरंग सोनवणे यांनी ज्या आवेशात भावना मांडल्या त्यातून त्यांचा लढवय्या करारी बाणा दिसून आला.

## पंकजा मुंडे आमदार किंवा खासदार होईपर्यंत चप्पल न घालण्याचा केला होता मनोदय

### संकल्प पूर्ण झाल्याने कासारीच्या ज्ञानोबाला आनंद

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीस पंकजा मुंडे या आमदार किंवा खासदार होईपर्यंत चप्पल न घालण्याचा संकल्प धारूर तालुक्यातील कासारी येथील एका युवकाने केला होता. तब्बल नऊ महिने अनवाणी फिरल्यावर पंकजा मुंडे यांची नुकतीच विधान परिषदेवर निवड झाल्यानंतर या तरुणाने आता चप्पल घालण्याचा निर्णय घेतला आहे.



कासारी येथील ग्रामपंचायत सदस्य तथा भाजपा कार्यकर्ता ज्ञानोबा बडे यांनी गतवर्षी विजयादशमीला १४ ऑक्टोंबर रोजी जोपर्यंत पंकजा मुंडे खासदार अथवा आमदार होत नाहीत तोपर्यंत पायात चप्पल न घालता अनवाणी फिरण्याचा संकल्प केला होता. पंकजाताईंचा लोकसभेच्या निवडणुकीत निसटता पराभव झाल्याने या युवकाने आपला संकल्प कायम ठेवला मात्र विधान परिषदेवर पंकजाताई मुंडे यांची नुकतीच निवड झाल्याने ज्ञानोबा बडे यांनी लोकनेत्या पंकजा मुंडे यांच्या हस्ते आपण चप्पल घालण्याचा संकल्प पूर्ण करणार असल्याचे माध्यमांना सांगितले आहे. बीड जिल्ह्यात मुंडे घराण्याशी असंख्य कार्यकर्त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. निवडणुका येथील जातील मात्र आयुष्यभर पंकजाताईंचे व मुंडे परिवाराचे भक्त म्हणून त्यांच्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी काही कार्यकर्ते करतात त्यातिलच ज्ञानोबा बडे एक असल्याचे सिद्ध झाले आहे. ज्ञानोबा बडे यांचा मनोदय पूर्ण झाला आहे. पंकजा मुंडे यांनी बडे यांना आपल्या स्वगृही बोलवून त्याचा यथोचित संकल्प पूर्ण करण्याची मागणी पंकजाताई मुंडे समर्थकांकडून होत आहे.

## गंभीर जखमी हरणाच्या मदतीला डॉक्टर,पत्रकार धावले मात्र वन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्याला उशिरा आली जाग

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराजवळील असणाऱ्या धानोरा रोडवर रेल्वे पटरी पुलाजवळ आज सकाळी काही महिला मॉर्निंग वॉकला जात होत्या त्याच दरम्यान पुलावरून एक हरीण पडून ते हरीन अतिशय गंभीरच्या जखमी झाले. पहाटे मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या महिलांनी त्याची सुटका कुत्र्याच्या तावडीतून करत त्याला वाचवले याची माहिती याच परिसरातून मॉर्निंगला जाणाऱ्या डॉक्टरांना व पत्रकारांना दिली. या परिसरातील जागरूक नागरिकांनी व पत्रकारांनी वन विभाग अधिकारी अनेक वेळा फोन केले. बराच वेळ अधिकारी कर्मचारी या ठिकाणी



पोहोचलेच नव्हते. हरीण म्हटलं तर अतिशय हावळा आणि भित्रा घाबरणारा वन प्राणी आज सकाळी रेल्वे पटरी आत्या दरम्यान पुरे करून पश्चिमेकडे जात असलेले हरण त्याच्यामागे काय भटके कुत्रे लागले होते. त्यामुळे ते हरिण स्पीडमध्ये धावत आले आणि रेल्वे पटरी च्या पुलात जोरदार खाली आपटले. त्यामुळे त्याचे दोन्ही पुढील पाय व तोंड रक्तबंबाळ झाले. गंभीररीत्या जखमी झाल्याने त्याला उठणे चालणे हे मुश्किल झाले होते. याच दरम्यान काही महिला मॉर्निंग वॉकला जात होत्या. त्यांनी ते पाहिले व त्यांनी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या लोकांना सांगितले. त्यावेळी या हरणाला मदतीची या परिसरातून अनेक जागरूक नागरिकांनी पत्रकार ज्ञानोबा वायबसे, डॉक्टर कुलदीप शहाणे , नगरसेवक रणजीत बनसोडे यांच्यासह अनेक उपस्थित नागरिकांनी त्या हरणाला मदत करत पशुवैद्यकीय दवाखाना येथे ऍडमिट करण्यासाठी मदत केली. ( अतिशय जवळ बीड शहराच्या आज सकाळी घटना घडल्यानंतर जखमी अवस्थेत तीन तास हरीण एका जागेवर पडून होते. वन विभागाच्या अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना अनेकांचे फोन गेले. मात्र तीन तासापेक्षा जास्त वेळाने या ठिकाणी काही कर्मचारी पोहोचले. तसं पाहिलं गेलं तर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती हे वनप्राणी वाचवण्यासाठीच केली आहे. त्यांच्या सुरक्षा साठी रक्षणासाठीच केलेली आहे. मात्र इथे तसं काही दिसलं नाही त्यामुळे त्यांच्या विरोधात संताप व्यक्त केला जात आहे. अशावेळी मात्र अधिकाऱ्यांनी तात्काळ पावले उचलली गेली पाहिजेत आणि वन प्राण्यांना जखमी प्राण्यांना तात्काळ मदत मिळाली पाहिजे.हे कार्य करण त्यांचं कर्तव्याचा आहे. आणि ते तात्काळ यांनी केलेच पाहिजे. अशी भावना उपस्थित नागरिकांमध्ये बोलली जात होती.

## कुंडलिक खांडेंच्या सरपंच संघटनेकडून मराठा बांधवांसाठी नाष्टा पाण्याची सोय

**बीड । प्रतिनिधी**

मराठा महायोध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांची गुरुवार दि.११ रोजी जनजागृती व शांतता रॅली बीडमध्ये प्रचंड समाज बांधवांच्या उपस्थितीत संपन्न झाली. जरांगे पाटील यांच्या या रॅलीस बीड जिल्ह्यातील लाखो मराठा बांधव उपस्थित राहिले होते.सरपंच/ उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या वतीने शहरातील पाच ठिकाणी समाज बांधवांच्या सेवेसाठी नाष्टापाण्याची सोय करण्यात आली होती. सरपंच/ उपसरपंच संघटनेचे कार्यकर्ते या कामी परिश्रम घेताना दिसून आले. समाज बांधवाच्या सेवेसाठी कुंडलिक खांडे समर्थकांकडून राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचा हजारो




बांधवांनी लाभ घेतला.

गुरुवार दि.११ जुलै रोजी मराठा महायोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या जनजागृती व शांतता रॅलीला लाखो मराठा समाज बांधव उपस्थित होते. जिल्हाभरातून आलेल्या मराठा समाज बाधवांसाठी सरपंच/ उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या वतीने तब्बल २५ क्विंटल गर्याचा शिरा,२५ क्विंटल तांदळाची खिचडी व ७५ हजार वॉटर बॉटलचे वितरण करण्यात आले. बीड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या नजीक, सुभाष रोड, बार्शी नाका भागात,अंबिका चौक ,आणि कुंडलिक खांडे यांच्या जालना रोड वरील संपर्क कार्यालय अशा पाच ठिकाणी समाज बांधवांसाठी नाष्टा पाण्याची सोय करण्यात आली होती. सरपंच/ उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष परमेश्वर तळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत राबवण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमास यशस्वी करण्यासाठी रंजित कदम, कल्याण कवचट, शिनुभाऊ बेद्रे, पांडुरंग गवते, अजय सुरवसे, संतोष घुमरे, कामरान खान, नसीन खान, देवराव घोडके, रोहीदास गोरे, गणेश घोडके, शुभम घोडके, राहूल घोडके, गणेश तळेकर, कल्याण खांडे, गोविंद तळेकर, राजेंद्र तळेकर, रामनाथ रहाडे, राजेश शिंदे, बापुराव नवले, चंद्रसेन चव्हाण, लक्ष्मण खांडे, अशोक शिंदे, गणेश जगताप, शामसुंदर भुसारी, बाबुराव तळेकर यांनी परिश्रम घेतले.

## आयशर टेम्पोतुन लाखोंचा गुटखा जप्त

बीड । प्रतिनिधी

मागच्या काही दिवसांपासून जिल्ह्यात गुटख्याची तस्करी वाढल्याच्या तक्रारी सुरु झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने दिंद्रुड हद्दीमध्ये आयशर टेम्पोतून लाखोंचा गुटखा जप्त केला आहे.पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले असून मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई सुरु असल्याचे कळते. स्थानिक गुन्हे शाखेची जबाबदारी उस्मान शेख यांनी स्वीकारल्यानंतर गुटखा तस्करांवर त्यांनी मोठी कारवाई केली आहे.आजच्या कारवाईत पोलिसांनी जवळपास ५० लाखांपेक्षा अधिकचा माल ताब्यात घेतल्याचे कळते. सध्या दिंद्रुड पोलीस ठाण्यात हा आयशर टेम्पो लावण्यात आला आहे.दरम्यान पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरु आहे.दरम्यान या कारवाईमुळे गुटख्याचे तस्कर आणि विक्रेत्यांमध्ये मात्र खळबळ उडाली आहे.

पान ६ वरून...

### २२ जुलै रोजी ठेवीदारांसह

(पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट ज्ञानराधा मल्टिस्टेट, साईनाथ परभणे, चंदुलाल बियाणी तसेच ज्ञानराधाचे उपअध्यक्ष यशवंत कुलकर्णी तसेच सर्व पतसंस्थांच्या संचालक मंडळांना अटक करावी या साठी प्रा.उबाळे यांनी प्रशासनाला पंधरा दिवसांला अल्तीमेटम दिला आहे. या संदर्भात उबाळे यांनी आज पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची भेट घेतली व चर्चा केली. यावेळी ज्ञानराधाच्या शिरूर शाखेतील दोन कर्मचारी व जिजाउ मल्टिस्टेट च्या संचालक यांना अटक केल्याचे सांगण्यात आले. मात्र परभणे, चंदुलाल बियाणी तसेच ज्ञानराधाचे उपअध्यक्ष यशवंत कुलकर्णी यांना अद्यापही अटक केली नाही. यामुळे प्रशासनाला १५ दिवसांचा दिलेला अल्टिमेटम अजून पूर्ण झाला नाही. जर वेळेत प्रशासनाने मागणी मान्य केली नाही तर २२ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठेवीदारांसह रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा प्रा. सचिन उबाळे यांनी दिला आहे.

### शिवसेना सदस्य नोंदणी

नियुक्ती करण्यात आली. या बैठकीसाठी जिल्हप्रमुख सचिन भैय्या मुळूक यांच्यासह शिवसेना, महिलाआघाडी, युवासेना, पदाधिकारी तथा लोकप्रतिनिधी, जिल्हा संघटक, जिल्हा समन्वयक, विधानसभा प्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहर प्रमुख, उपतालुकाप्रमुख, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख व सर्कलप्रमुख यांची उपस्थिती होती.

### अक्षरगंगा प्रज्ञा शोध

जोगदंड व पुरुषोत्तमपुरी येथील मुख्याध्यापिका अनिता जोगदंड, मुलीच्या आई वडीलांचा या होतकरू मुलींचा यशा बद्दल सांगली येथे पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते गौरव चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच बार्शी येथे सुधीर फाटक यांच्या हस्ते आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला.

### गेवराई तालुका खरेदी विक्री

अध्यक्षपदी तर गणपत राठोड यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी अमरसिंह पंडित यांनी जयदीप औटी यांचे शाल,श्रीफळ देवुन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहायक निबंधक श्रीमती कदम, मिलिंद देशपांडे यांनी काम पाहिले. यावेळी राजेंद्र वांगे, सुभाष मस्के, अॅड. एस.एच. पाटील, शामराव मुळे,शंकरराव तौर, गणेश वडघणे, शंकरराव पवार, संग्राम आहेर, किशोर कांडेकर, रावसाहेब देशमुख, वसिम सौदागर, विष्णू आडे, वचिष्ठ घमाट, दत्ता संत आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## आदर्श गाव वंजारवाडी ग्रामस्थांचे पावसासाठी मारूतीरायाला साकडे

### शेकडो ग्रामस्थांनी दिडी काढून केला अभिषेक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा नव्हे तर मराठवाड्यातील आदर्श, सुंदर आणि प्रचंड एकी असलेले गाव बीड तालुक्यातील वंजारवाडी हे आहे. गावाची एक प्रथा आहे, ती म्हणजे पाऊस नाही त्या वर्षी गावातील ग्रामस्थ दिंडी काढून शिवाच्या बाहेर असलेल्या मारूतीला पावसासाठी साकडे घालतात. आदर्शगाव वंजारवाडी ग्रामस्थांनी अबाल- वृध्दांसह गजानन कारखान्याच्या पाठीमागे मारूती मंदीरापर्यंत टाळ- मृदंगाच्या गजरात दिंडी काढून दमदार पावसासाठी साकडे घातले.

बीड तालुक्यातील वंजारवाडी हे गाव अतिशय निसर्गाच्या सानिध्यात आहेत. तळमळीने केलेल्या विकास कामांमुळे गेल्या ३५ वर्षापासून गावाचा कारभार वैजिनाथनाना तांदळे यांच्याकडे आहे. गावकर्यांनी एवढी वर्षे टाकलेला विश्वास वैजिनाथ तांदळे यांनी सार्थ ठरवला असून मोठ्या शहरात नसतील एवढ्या नागरी सोय- सुविधा वंजारवाडी गावात आहेत. गावात शेकडो नव्हे तर हजारो वृक्षांचे रोपण करून लावलेले प्रत्येक झाड सरपंच आणि सर्व ग्रामस्थांनी पोटच्या लेकराप्रमाणे जोपासले आहे. वैजिनाथ तांदळे व सर्जेराव तांदळे या दोन भावांच्या योगदानामुळे शहरी भागच नव्हे तर मुंबई- पुणे एक्सप्रेसवे हायवे सारखे दर्जेदार रस्ते संपुर्ण वंजारवाडी गावात आहेत. अंबा, जांभळ, नारळ अशी हजारो झाडे या गावच्या प्रत्येक रस्त्यावर दोन्ही बाजुला आहेत. केवळ बीड जिल्हा नव्हे तर संपुर्ण मराठवाड्यात नसेल असे देखणे आणि आदर्श गाव वंजारवाडी हे आहे. वंजारवाडी गावात एक वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा आहे. ती म्हणजे ज्या वर्षी पाऊस नसेल त्या वर्षी शिवाच्या बाहेर असलेल्या गजानन साखर कारखान्याच्या मागील बाजूस असलेल्या मारूती मंदीरापर्यंत दींडी काढत ग्रामस्थ जातात अन् ? मारूतीरायाला अभिषेक करून पावसाचे साकडे घालतात. आदर्शगाव वंजारवाडी गावातील अबालवृध्दांनी गावचे प्रमुख वैजिनाथनाना तांदळे यांच्या उपस्थितीत वंजारवाडी ते मारूती मंदीर अशी टाळ- मृदंगाच्या गजारात पायी दिंडी काढून मारूती मंदीरात अभिषेक करत पावसासाठी साकडे घातले. या दिंडीत वंजारवाडी येथील ग्रामस्थ, लहान मुले, वयोवृध्द मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



**बीड : तालुक्यातील वंजारवाडी ग्रामस्थांनी पावसासाठी मारूतीरायांना साकडे घातले.**

### वंजारवाडीत नशा बंदी

३५ वर्षापासून गावचा कारभार हाकत असलेल्या तांदळे बंधुंनी गावात प्रत्येक सोय- सुविधा केली आहे. यात पीण्यासाठी फिल्टरचे पाणी, १ रूपये किलोप्रमाणे दळन दळून देणारी पिठाची गिरणी, होलसेल भावात किराणा साहित्य देणारे ग्रामपंचायतीचे एकमेव किराणा दुकान, गॅस एजन्सी, दाळ मिल, चटणी कुटण्याचे यंत्र, शेंगा फोडण्याचे यंत्र ग्रामपंचायतीचे आहे. जे ना नफा ना तोडा तत्वावर चालवले जाते. विशेष म्हणजे, गावात नशाबंदी असून जो कोणी दारू पीऊन अथवा ईतर नशा करून येईल, त्याला दंड केला जातो. गावाता अंबा, नारळ, जांभळ यांची एवढी झाडे लावली आहेत की प्रत्येकवर्षी गावकर्यांना काही डझन आंबे गावातील सार्वजनिक झाडांची घरपोच मिळतात. सारे गावकरी मिळवून महिन्यात किमान एकदातरी गाव, परिसरातील रस्ते यांची स्वच्छता करतात.

### कागदोपत्री नाही तर खरे आदर्श गाव

**अतिशय निसर्गरम्य डोंगराची छोटी टेकली असलेल्या ठिकाणी वंजारवाडी हे गाव वसलेले आहे. गावाच्या ऊशाला छोटेशे धरण आहे. तांदळे बंधुंनी गावाचा एवढा विकास केला आहे की, गावात प्रवेश करण्यासाठी तिन- चार रस्ते आहेत. प्रत्येक रस्त्या मुंबई- पुणे एक्सप्रेस हायवे सारखा दर्जदार आहे. रस्त्याच्या दुतर्फा आंबे, नारळ, जांभळ अशी झाडे लावलेली आहेत. रस्ते ३० ते ४० फुटांपेक्षा मोठे असून गावात प्रवेश करताना हे गाव बीड जिल्ह्यातील आहे, यावर विश्वास बसत नाही.**

# शेतकऱ्यांना मिळणार वार्षिक १०,००० रुपये

## अर्थसंकल्पामध्ये मोठ्या बदलाची नांदी

पुणे : केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीने तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली. हे सरकार यंदा त्यांचा पहिला अर्थसंकल्प सादर करेल. अर्थमंत्री निर्मला सीतारमण या आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी महत्वपूर्ण घोषणा करतील. शेतकऱ्यांना या बजेटकडून मोठ्या अपेक्षा आहेत. त्यांना खते आणि रसायनांवरील कर कपातीसह कर्ज माफीची अपेक्षा आहे. तर केंद्र सरकार त्यांना पीएम किसान योजनेचा हप्ता वाढवून दिलासा देण्याच्या प्रयत्नात आहे. सध्या पीएम किसान योजनेतंर्गत वार्षिक ६ हजार रुपये हप्ता मिळतो. या हप्त्यात भरघोस वाढीची योजना आहे.

अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा हप्ता वाढविण्याची अपेक्षा आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेचा हप्ता वाढविण्यात येऊ शकतो. सध्या त्यांना वार्षिक ६००० रुपये हप्ता मिळतो. तो वाढवून सरकार १०,००० रुपये करण्याच्या विचारात आहे. सध्या तीन हप्त्यात ही रक्कम देण्यात येते. सरकार चार हप्त्यात रक्कम देऊ शकते. पीएम किसान योजनेचा हप्ता वाढला तर शेतकऱ्यांना अनेक कामासाठी ही रक्कम उपयोगी पडेल. त्यांना खते, बि-बियाणे खरेदीसाठी त्याचा वापर करता येईल. केंद्र सरकारने फेब्रुवारी २०१९ मध्ये शेतकऱ्यांन मदतीसाठी पीएम



किसानची घोषणा केली होती. तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान योजनेचा १७ वा हप्ता नुकताच जमा केला.

किसान सन्मान निधीची योजनेत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरतंर्गत रक्कम जमा होते. दर चार महिन्यांनी तीन हप्त्यात ही रक्कम जमा करण्यात येते. पण पात्रता निकष, त्यातील काही अटी आणि शर्तीमध्ये अडकलेल्या काही शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. त्यामुळे आता सरकारने शेती अवजारे, ट्रॅक्टर, खत, रसायने आणि शेतीसंबंधीच्या इतर खरेदीवर सबसिडी द्यावी आणि ती डीबीटी माध्यमामार्फत थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी पण जोर धरु लागली आहे.

०००

स्वस्त दराने कर्ज द्यावे

शेतकऱ्यांना स्वस्त दराने कर्ज देण्यासाठी सरकारने एक स्वतंत्र एजन्सी नेमावी. त्यामाध्यमातून योग्य आणि पात्र शेतकऱ्यांना स्वस्त दराने कर्ज द्यावे. त्यासाठी डीबीटी माध्यमाचा वापर करावा अशी मागणी पण जोर धरत आहे. काही विकास कार्यक्रमासाठी शेतकऱ्यांची निवड करावी. त्यांना प्रशिक्षण द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. सध्याच्या ज्या काही शेतकरी विकास संस्था, बँका आहेत, त्यांचा शेतकऱ्यांना किती फायदा होतो, याची समीक्षा करण्याची मागणी होत आहे. तर एक मध्यस्थ नोडल संस्था उभारण्याची मागणी शेतकरी वर्ग करत आहे.

## अनुसूचित जाती, जमातींसाठी 'दुधाळ जनावर गट पुरवठा योजना'

दुधाळ जनावरांची गट पुरवठा योजना ही समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आणि अनसूचित जाती, नवबौद्ध आणि जमातींना सक्षम बनवण्यासाठी, शासना मार्फत राबवली जाणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेअंतर्गत, पात्र लाभार्थ्यांना दोन दुधाळ गाई किंवा म्हशी खरेदीसाठी ७५% अनुदान दिले जाते.

योजनेचे फायदे : ग्रामीण भागात राहणाऱ्या गरीब कुटुंबांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होते. दुधाचे उत्पादन वाढून त्याद्वारे उत्पन्न वाढते. पशुधन विकासामुळे शेतीला पूरक व्यवसाय मिळतो. कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते.

योजनेसाठी पात्रता : अर्जदाराचे वय १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असणे आवश्यक आहे. लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील असणे आवश्यक आहे. १ हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेले लहान आणि अत्यंत लहान शेतकरी पात्र आहेत. रोजगार आणि स्वयंरोजगार केंद्रात नोंदणीकृत बेरोजगार आणि महिला बचत गटातील सदस्यांना प्राधान्य दिले जाते.

योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रक्रिया : इच्छुक लाभार्थ्यांनी जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयात अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समिती पात्र लाभार्थ्यांची निवड करते. निवड झालेल्या लाभार्थ्यांना ७५% अनुदान दिले जाते. लाभार्थ्यांनी एका महिन्यात अनुदानाचा हिस्सा जमा करणे आवश्यक आहे किंवा बँकेचे कर्ज घेणे आवश्यक आहे. तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी दुधाळ जनावरे खरेदी करतील. योजनेची यशस्वी अंमलबजावणी : २०२३-२४ मध्ये, या योजनेसाठी २ कोटी ५६ लाख १९ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली. २०२२-२३ मध्ये, या योजनेद्वारे ३९४ लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे.



## सोयाबीनवरील खोड कीड व पाने गुंडाळणाऱ्या अळीचे नियंत्रण!

ज्या भागात सोयाबीनची पेरणी जून महिन्यात झाली तेथे सोयाबीन पीक रोप अवस्थेत असून दोन ते तीन आठवड्यांचे झालेले आहे. कोरड्या वातावरणामुळे सोयाबीन पिकावर खोड माशी व पाने गुंडाळणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भावाच्या प्राथमिक अवस्थेत या किडींचे व्यवस्थापन करणे हे सुदृढ पीक वाढीसाठी व त्यापासून चांगले उत्पादन मिळवण्यासाठी आवश्यक असते. या किडींचे शास्त्रोक्त पद्धतीने नियंत्रण व व्यवस्थापन करण्याविषयी माहिती पुढील प्रमाणे देण्यात आली आहे.

सोयाबीन पिकावरील किडीचे नियंत्रण उपाय : खोडमाशी - उगवणीपासून ७ ते १० दिवसापर्यंत या किडीचा प्रादुर्भाव पिकावर दिसून येतो, त्यामुळे प्रादुर्भावग्रस्त रोपे पिवळी पडून सुकतात व मरून जातात. झाड पोखरल्यामुळे अन्नद्रव्याचा पुरवठा कमी होऊन पाने पिवळी पडून त्यावर लालसर काळे ठिपके दिसू लागतात, तसेच पानाचा अर्धा भाग सुकून वरच्या बाजूस मुरडला जातो व रोपे वाळून मरून जातात. परिणामी शेतातील रोपांची संख्या कमी होते व उत्पादनात घट येते. पिकाच्या वाढीच्या नंतरच्या अवस्थेमध्ये खोडमाशीचा प्रादुर्भाव झाल्यास रोपे सुकत नाहीत परंतू, खोड पोखरल्यामुळे शेंगांची संख्या व सोयाबीनच्या बियांचे वजन कमी होते तसेच काही शेंगांमध्ये दाणे भरले जात नाहीत.

खोडमाशी नियंत्रण/व्यवस्थापन : १० ते १५% प्रादुर्भावग्रस्त झाडे, या आर्थिक नुकसान पातळीवर नियंत्रणात्मक उपाययोजना करावी. सोयाबीनची पेरणी वेळेवर म्हणजे जून



महिन्यात योग्य वाफस्यावर केल्यास या किडीचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात दिसून येतो. किडीस प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी. पेरणीच्या वेळी थायमेथोक्झाम (३० ) १० मिलिची प्रति एक किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. पीक ७-१० दिवसांचे असताना किडीच्या प्रादुर्भावाची लक्षणे दिसताच थायमेथोक्झाम २५% ७५ ग्रॅम प्रति हेक्टर किंवा थायमेथोक्झाम १२.६०% + लॅम्बडा-सायहॅलोथ्रिन ९.५०% झेड.सी. १२५ मिलि प्रति हेक्टर ५०० लिटर पाण्यामध्ये मिसळून पिकावर फवारावे.

पाने गुंडाळणारी अळी : या किडीच्या अळ्या सुरवातीला पाने पोखरून त्यावर उपजीविका करतात, नंतर ही कीड एक किंवा अधिक पाने एकमेकांस जोडून पानाच्या सुरळीत राहून त्यातील हरितद्रव्यावर जगते. प्रादुर्भावीत झालेली काही पाने गळून पडतात.

पाने गुंडाळणारी अळीचे नियंत्रण/व्यवस्थापन : किडीच्या प्रादुर्भावाच्या सुरुवातीच्या कालावधीत गुंडाळलेली किंवा सुरळी झालेली पाने तोडून घेऊन शेताबाहेर जमिनीत पुरून टाकावीत किंवा योग्य उपाययोजना करून अळ्यांचा नायनाट करावा. या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास पिकावर क्विनॉलफॉस २५ इ.सी. १.५ लिटर प्रति हेक्टर किंवा प्रोफेनोफॉस १ लिटर प्रति हेक्टर किंवा इंडोक्झाकार्ब १४.५ एस.सी. ५०० मि.ली. प्रति हेक्टर किंवा क्लोरांट्रनीलिप्रोल १८.५ एस.सी. १५० मि.ली. प्रति हेक्टर यापैकी एका कीटकनाशकाची आलटून पालटून ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## कांदा दुभाळणे किंवा जोड कांदा होण्यामागची कारणे व उपाय

सध्या बरेच शेतकरी कांदा पीक लागवडीकडे वळले आहेत. त्यामधून त्यांना अपेक्षित असे उत्पन्नही मिळत आहे. परंतू अनेक शेतकऱ्यांची समस्या राहिलेली आहे की त्यांच्या कांदा प्लॉटमध्ये दुभाळका किंवा जोडकांदा तयार होत आहे. म्हणजेच एकाच कांद्यापासून दोन कांदे तयार होत आहेत. जोड कांद्याला बरेच ठिकाणी बेळा कांदा असे म्हणतात. आपल्यापैकी बरेच शेतकऱ्यांना ही गोष्ट माहित नाही की दुभळका किंवा जोडकांदा का तयार होतो आणि तो कांदा तयार होऊ नये म्हणून काय उपाययोजना कराव्यात. याबाबत माहिती घेतल्यास उपाय करता येतात.

दुभाळका किंवा जोड कांदा तयार होण्याची कारणे : अ) खतांचा अतिरेक - बरेच शेतकरी कांद्याचे जास्त उत्पादन मिळेल या गैरसमजातून जास्त रासायनिक खत टाकतात. कांद्याचे खत व्यवस्थापन करताना जास्त प्रमाणात शेतकऱ्याकडून जर पोटॅश युक्त खतांचा अतिरिक्त वापर जास्त झाला तर पोग्यामधून डबल कोंब बाहेर येतो. आणि कांद्याचे दोन भाग होऊन जोड कांदा तयार होऊ शकतो. ब) अतिरिक्त पाण्याचा वापर - दुभळका किंवा जोड कांदा तयार होण्यामध्ये अतिरिक्त पाण्याचा वापर हे एक प्रमुख कारण आहे. शेतकरी बांधवांनो तुम्ही जर कांदा लागवड करताना योग्य प्रमाणात आणि वेळोवेळी पाणी न देता कांद्याला जास्त पाणी दिले तर आपल्याला





कांद्याची पात तर हिरवीगार झालेली दिसते पण यामुळेच जोड कांदा देखील तयार होऊ शकतो. क) गुणवत्तापूर्ण बियाण्यांचा अभाव : प्रत्येक शेतकरी स्वतःसाठी काहीना काही प्रमाणात कांद्याची बी साठवून ठेवत असतो. परंतु नंजर चुकीने शेतकऱ्यांकडून जोडकांद्याचे बियाणे तयार झाले आणि ते पेरणीसाठी वापरण्यात आले तर जोड कांदा तयार होऊ होतो. ड) पोषक फवारणी : कांदा पिकामध्ये फवारणी करताना आपण विविध संजीवके फवारणीसाठी वापरतो. आणि याच फवारणीमध्ये आपण जर पोटॅशियमचा वापर जास्त प्रमाणात केला तर दुभाळका किंवा जोड कांदा तयार होतो.

जोडकांदा तयार होऊ नये म्हणून उपाययोजना :

अ) खत व्यवस्थापन - कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार जे खत वापरायला सांगितले आहे त्याच खतांचा वापर शेतकऱ्यांनी करायला पाहिजे. कोणत्याही खताचा अतिरिक्त वापर न करता नत्र, स्फुरद व पालाश यांचे प्रमाण प्रति हेक्टरी १००:५०:५० किलो प्रमाणात घेऊन वापरावे. मिश्र खतांमध्ये आपण पोटॅशियम वापरले पाहिजे. वेगळे पोटॅश वापरण्याची गरज नाही. तसेच आपण कांदा लागवड केल्यानंतर बोरॉन चा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे कांद्याला क्रॅक जात नाही आणि जोड कांदा तयार होत नाही.

ब) योग्य पाणी व्यवस्थापन - कांदा लागवड केल्यानंतर साधारणता ११० ते १२० दिवसांमध्ये कांदा काढायला येतो. त्यासाठी पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. कांद्याला शेवटचे पाणी ९० दिवसांपर्यंत द्यावे त्यानंतर पाणी देऊ नये. जर पाणी योग्य प्रमाणात दिले नाही किंवा जास्त प्रमाणात पाणी दिले तर कांद्याला क्रॅक जाऊन जोड कांदा तयार होतो.

क) गुणवत्ता पूर्ण बियाणांचा वापर - कांदा लागवड करताना कंपनीचे बियाणे वापरणे खूप गरजेचे असते. कारण त्या बियाण्यांची निवड टेस्टिंगद्वारे केलेली असते. घरगुती बियाणे वापर केल्यास आपल्याला जोडकांदा बियाणे झालेले असल्यास समजत नाही. आणि अशी बियाणे वापरल्यास जोड कांदा तयार होतो व उत्पादनात घट येते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८९ : पॅरिस मध्ये नागरिकांनी फ्रेंच राज्यसत्तेचे दडपशाहीचे चिन्ह असलेल्या बॅस्टिल तुरुंगावर हल्ला केला आतील सात बंद्यांची मुक्तता केली. ही घटना म्हणजे फ्रेंच क्रांतीची मुहूर्तमेढ होती.
१८५३ : न्युझीलंड मध्ये प्रथमच सार्वत्रिक निवडणुका झाल्या.
१८६७ : आल्फ्रेड नोबेल यांनी 'डायनामाईट' या स्फोटकाचे यशस्वी परीक्षण केले.
१९०१ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, राजकारणी आणि पत्रकार रती राम देशबंधू गुप्ता यांचा जन्मदिन.
१९०२ : उत्तरप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री चंद्र भानू गुप्ता यांचा जन्मदिन.
१९२० : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचा जन्मदिन.
१९५८ : इराक मध्ये राजेशाही विरुद्ध उठाव. अब्दुल करीम कासम सत्तेवर.
१९६० : चिंपांझींचा अभ्यास करण्यासाठी जेन गुडॉल या टांझानियातील अभयारण्यात दाखल झाल्या. पुढील ४५ वर्षे त्यांनी चिंपांझींमधील कौटुंबिक व सामाजिक संबंध समजून घेण्यासाठी संशोधन केले.
१९६९ : अमेरिकेने ५००, १,०००, ५,००० व १०,००० च्या नोटा चलनातुन काढुन टाकल्या.
१९७६ : कॅनडात मृत्यूदंडाच्या शिक्षेवर बंदी घालण्यात आली.
२००३ : जागतिक बुद्धिबळ महासंघ द्वारा सन्दीप चंदा यांना ग्रँडमास्टर पुरस्कार मिळाला.
२०१३ : डाक व तार विभागाची १६० वर्षांपासुन सुरू असलेली तार सेवा बंद झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : गोपाळ गणेश आगरकर लोकमान्य टिळकांचे सहकारी व 'केसरी'चे पहिले संपादक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक संस्थापक व फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य, समाजसुधारक, विचारवंत व शिक्षणतज्ञ, 'सुधारक' या वृत्तपत्राचे संस्थापक व संपादक (मृत्यू: १७ जून १८९५)
१८६२ : ऑस्ट्रियन चित्रकार गुस्टाफ क्लिम्ट यांचा जन्म.
१८८४ : यशवंत खुशाल देशपांडे महानुभाव वाङ्मयाचे नामवंत संशोधक, १९३९ मधे झुरिच येथे झालेल्या जागतिक इतिहास परिषदेतील भारताचे प्रतिनिधी (मृत्यू: २० नोव्हेंबर १९७०)
१८९३ : भारतीय कवी आणि लेखक गारिमेला सत्यनारायण यांचा जन्म. (मृत्यू: १८ डिसेंबर १९५२)
१९१० : टॉम अँड जेरीची चित्रे काढणारा चित्रकार विल्यम हॅना यांचा जन्म.
१९१७ : रोशनलाल नागरथ ऊर्फ 'रोशन' संगीतकार (मृत्यू: १६ नोव्हेंबर १९६७)
१९२० : शंकरराव चव्हाण केंद्रीय अर्थमंत्री, गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री (मृत्यू: २६ फेब्रुवारी २००४)
१९४७ : नवीन रामगुलाम मॉरिशसचे ३ रे व ६ वे पंतप्रधान
१९६७ : हशन तिलकरत्ने श्रीलंकेचा क्रिकेटपटू व राजकारणी
१९७१ : भारतातील अग्रगण्य अष्टपैलू खेळाडू ज्यांनी केवळ क्रिकेट आणि टेनिसमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले नाही तर फिल्ड हॉकी, सॉकर, टेबल टेनिस, बुद्धीबळ आणि पोलो खेळांमध्ये देखील पारंगत असणारे सय्यद मोहम्मद हाडी यांचे निधन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०४ : दक्षिण आफ्रिकेचे क्रांतिकारी पॉल क्रुगर यांचे निधन.
१९३६ : भारतीय वंशाचे लेखक आणि विद्वान धन गोपाळ मुखर्जी यांचे निधन. (जन्म: ६ जुलै १८९०)
१९६३ : स्वामी शिवानंद सरस्वती योगी व आध्यात्मिक गुरू (जन्म: ८ सप्टेंबर १८८७)
१९७५ : मदनमोहन संगीतकार (जन्म: २५ जून १९२४)
१९७९ : अमेरिकेने अणुचाचणी केली.
१९९३ : श्रीमंत विजयमाला राणीसाहेब करवीर संस्थानच्या महाराणी, खासदार (जन्म:)
१९९८ : मॅकडॉनल्ड चे सहसंस्थापक रिचर्ड मॅकडोनाल्ड यांचे निधन. (जन्म: १६ फेब्रुवारी १९०९)
२००३ : लीला चिटणीस हिंदी चित्रपट अभिनेत्री (जन्म: ९ सप्टेंबर १९०९)
२००३ : प्रो. राजेंद्र सिंग ऊर्फ 'रज्जू भैय्या' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ४ थे सरसंघचालक (जन्म: २९ जानेवारी १९२२)
२००४ : स्वामी कल्याणदेव, पद्म भूषण पुरस्कार विजेते धर्मगुरू, विचारवंत , समाजसुधारक
२००८ : यशवंत विष्णू चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (जन्म: १२ जुलै १९२०)

## केळीवरील सोंडेकीड नियंत्रक स्मार्ट सापळ्यास मिळाले पेटंट

कोल्हापूर : केळी पिकांवरील सोंडेकीड नियंत्रणाच्या स्मार्ट सापळ्याच्या डिझाइनला भारत सरकारकडून पेटंट मिळाले आहे. कोल्हापूर येथील राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हा सापळा बनवलेला आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवम मद्रेवार याने सहकारी मित्रांच्या सोबत महाविद्यालयाच्या उद्यानविद्या विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. रवींद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले.

सोंडेकिडीच्या एकात्मिक नियंत्रणासाठी किडीच्या भुंग्याना आकर्षित करणाऱ्या कामगंध सापळ्यामध्ये खाद्यरूपी आमिष स्पंजाचा आणि महाविद्यालयात उत्पादित होत असलेल्या मेटाऱ्हायझीम या जैविक कीटकनाशकाचा वापर करीत हा सापळा तयार केला. केळीवर सोंडकिडीचे प्रमाण वाढत चालले असून, ती भविष्यातील मोठी समस्या होण्याचे संकेत मिळत आहेत. या किडीच्या नियंत्रणासाठी कीटकनाशकांची फवारणी केल्यास रसायनांचे अवशेष फळामध्ये आढळून येते. रासायनिक औषधांचा मारा करणे हा निर्यातक्षम केळी उत्पादनाच्या दृष्टीने चिंतेची बाब होती. यावर स्मार्ट सापळा हा चांगला उपाय आहे. या संशोधनामुळे सोंडेकिडीच्या नियंत्रणास मदत होणार आहे. व निर्यातक्षम केळीत सुद्धा रासायनिक कीटकनाशकाचे अवशेष आढळणार नाहीत.

कृषी महाविद्यालयाच्या चतुर्थ वर्षाचा विद्यार्थी मद्रेवार याच्या पुढाकाराने संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या या गटात संगीता धिन्वा, अपूर्वा श्रीष्टी, सिद्धाली शेगर, यश कांबळे, तुषार चव्हाण यांचा सहभाग आहे. पेटंट प्राप्त करणाऱ्या या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे यांनी विशेष समारंभात अभिनंदन केले.

cmyk



# बीड जिल्ह्याने भरभरून प्रेम दिल्याने विकासात्मक कामे करु शकले

## मावळत्या जिल्हाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांचे निरोप समारंभ प्रसंगी भावपूर्वक उद्गार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये विकास कामे करतांना अनेक अडचणी आल्या पण बीड जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांच्या प्रेमामुळे त्यावर मात करून बीड जिल्ह्याचा नेहमीच विकासात्मक दृष्टीने विचार केला आणि ही कामे तडीस नेली. शासन आपल्या दारी, महासंस्कृती कार्यक्रम आणि बीड जिल्ह्यात बालविवाह हा ऐरणीवरचा प्रश्न होता. यामध्ये विशेष लक्ष घालून ही मोहीम यशस्वी होण्यासाठी विविध विभागाने मदत केली. त्यामुळे अनेक वेळा बालविवाहही रोखण्यात आले. सर्वांच्या सहकार्याने अनेक विकासात्मक कामे करु शकले, असे भावपूर्वक उद्गार मावळत्या जिल्हाधिकारी दिपा मूधोळ मुंडे यांनी निरोप समारभ प्रसंगी काढले. विशेषत: हा नूतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक (तत्कालीन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी) , मुख्य कार्यकारी अधिकारी संगितादेवी पाटील तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर आणि संबधित यंत्रणेने मोलाचे सहकार्य केले.कृषी क्षेत्रातही बीड जिल्हयाला पहिला क्रमांक मिळाला ही पण आपल्या सर्वासाठी अभिमानाची बाब आहे.




बीड जिल्ह्याविषयी अनेक वेळा नकारात्मक विचारच ऐकायला मिळाले. आपण जेव्हा कोणत्याही कामाचा मनातून ठाम निश्चय करून ते करण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी ते सकारात्मकतेतून पूर्णत्वास जाते, बीड जिल्ह्याच्या आठवणी हया अमिट आहेत, त्या मी कधीही विसरू शकणार नाही. घर सांभाळणे, कुटुंब सांभाळणे ही जबाबदारी केवळ महिलांचीच नसून पुरुषांची देखील आहे. जे गरीब, पिडीत लोक आहेत त्यांची कामे, करा त्यांचा अर्शिवाद नक्कीच तुमच्या कामी येईल. बीड जिल्हयात मोठे उद्योग, कारखाने नाहीत त्यामुळे तरुण वर्गाच्या हाताला काम नाही येथे मोठे उद्योग येतील यासाठी प्रयत्न करावा,तरुण पिढीला याचा उपयोग होईल. शेवटी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे निरोप समारंभाला उत्तर देताना म्हणाल्या की, मुलांना जपा त्यांच्या शिक्षणाकडे, आरोग्याकडे लक्ष द्या, बीड जिल्ह्यामध्ये तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे ही फार गंभीर बाब आहे, असे भावनिक उद्गारही मावळत्या जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

नूतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे म्हणाले की. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी नेहमीच कटिबद्ध राहील. मावळत्या जिल्हाधिकारी यांच्यामध्ये मला नेहमी आईच दिसत असे, त्यांनी नवरात्रीची तीनच रूपे दाखवली, अष्टमी व नवमीचे रूप त्यांनी कधी दाखवलेच नाही, त्यांच्या कामाची हातोटी आणि संयम हा नेहमीच लक्षात राहण्यासारखा आहे. बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणूक हा सर्व देशात लक्ष वेधून घेणारा विषय होता पण तोही त्यांनी संयमाने, चातुर्याने हाताळला, जिल्हयात जाळपोळ झाली त्यावेळी त्यांनी फक्त यंत्रणाचा कामाला लावली नाही तर त्या स्वत: रस्त्यावर उतरल्या व जमाव शांत केला. कोणतेही काम असो जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे हया स्वत: पुढाकार घेउन करत असत , ही मोठी महत्त्वाची बाब आहे. श्रीमती मुधोळ-मुंडे यांचा संयमाने काम करण्याचा आदर्श घेण्यासारख असून त्यांच्या सोबत छत्रपती संभाजीनगरपासून ते बीड जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार सांभाळल्यापासूनचा अनुभव माझ्या पुढील वाटचालीस निश्चितच कामी येईल, असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यावेळी म्हणाले. या कार्यक्रमास नूतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेश सूर्यवंशी, जिल्हा शल्य चिकित्सक अशोक बडे, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुंबे,उप मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके व विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या पदाधिकारी यांनी श्रीमती मुंडे यांचा सत्कार केला तसेच आपल्या मनोगतातुन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांच्या सोबत काम करतानाचे अनुभव सांगितले.

# मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते गेले कुठे?

## लोकवर्गणीतून ग्रामस्थांवर रस्ते करण्याची वेळ



लिंबागणेश । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने नुकत्याच काढलेल्या आदेशाने राज्यातील मातोश्री पाणंद रस्त्यांना दर्जावाढ देण्याचा निर्णय घेतला असुन जिल्हा परिषद बांधकाम विभाग व पंचायत समितीचा वित्त आयोगाचा निधी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला असुन बीड जिल्ह्यात २५०० पाणंद रस्त्यांना दर्जावाढ मिळाल्याची प्रसार माध्यमांमध्ये गाजावाजा करणा-या जिल्हा प्रशासनाचा बुरखा सध्या पावसाळ्यात ग्रामीण भागातील ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारुन त्रस्त ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून रस्ता कामास सुरुवात केल्याने पुरता फाटला असुन शासनाप्रती तिव्र नाराजी ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत अंतर्गत वायभट वस्ती, गिरे वस्ती, शिंदे वस्ती, मुळे वस्ती, जोगदंड वस्ती, शिंदे वस्ती येथील जवळपास एकुण २०० लोकसंख्या असलेल्या ग्रामस्थांना पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून अडीच किलोमीटर अंतरावरून लेकरांची शाळा, भाजीपाला,दुधदुभतं, बाजारहाट यासाठी लिंबागणेश गावात यावं लागतं.७५ वर्षांपासून आम्हाला रस्ता मिळालाच नाही. लेकरांच शिक्षण व्हावं म्हणून लेकरं बाहेरगावी शिकायला टाकली. चिखलामुळे शेतमजूर शेतात यायला तयार नाहीत.शेवटी ४० कुटुंबातील व्यक्तींनी घरागणीस ५००० रूपये लोकवर्गणीतून २ लाख रुपये जमा केले असुन रस्ता कामाला सुरुवात केली आहे. बळीराजाचं नाव घेऊन सरकार चालवताना शेतकऱ्यांच्या रस्ता, वीज, पाणी सारख्या मुलभूत गरजा स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षं उलटुनही पुर्ण करू शकत नसल्याची खंत बोलावून दाखवली.रस्ताकामासाठी अच्युत वायभट, सतिश वायभट, अभिजित गायकवाड, गणेश खिल्लारे, दिनेश जोगदंड,उमेश जोगदंड, अतुल जोगदंड,संजय पौळ, विक्की भोसले, महादेव जाधव,गोकुळ मुळे,आण्णा मुळे,बाळु मुळे,कृष्णा गिरे, गोवर्धन गिरे,सुंदरभाऊ वाणी, अशोक खिल्लारे, राजेंद्र बाबर,सतिश शिंदे, शेख शौकत यांनी पुढाकार घेतला. ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आली मात्र पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्ता कामे अपेक्षित असताना शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी प्राप्त असुन भ्रष्टाचाराचे कुरण झाल्याने योजना कागदावरच कार्यान्वित असल्याचे आढळून येत आहे.शासनाने ग्रामस्थांच्या अडचणींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# महावितरण मधील कंत्राटी कामगारावर उपासमारीची वेळ

## १६ तारखे पासून ४२ कामगार आमरण उपोषण करणार

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील हातावर पोट असणारे अनेक महावितरण कंत्राट कामगारावर तीन महीण्या पासुन पगार नसल्याने उपास मारीची वेळ आली आहे त्यामुळे १६/०७/२०२४ पासुन ४३ कंत्राट कामगार बीड मंडळ कार्यालय येथे अमरण उपोषणाला बसणार आहेत याविषयी सविस्तर वृत्त असे की सर्व वीज कंत्राटी कामगार केज विभाग यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे की कि आम्हांला माहे,एप्रिल, में, जून, तीन महिन्याचे पगार (पेमेंट) अजून झाले नाही. ३ महिने आमची पगार झाली नाही आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

३ महिने पगार नसल्यामुळे आम्ही आमच्या घरात किरान भरु शकत नाही ३ महिने पगार नसल्याने घरातील व्यक्ती आजारी पडल्यावर आमच्याकडे उपचारासाठी पैसे नाहीत ३ महिने पगार नसल्याने मुलांच्या शिक्षनाचा खर्च करू शकत नाही ३ महिने पगार नसल्याने स्वतःच्या तबियत ची काळजी घेऊ शकत नाही ३ महिने पगार नसल्याने आई वडिलांना मेडिकल गोळ्या देऊ शकलो नाही एक आवर्जून विनंती, आम्हा कामगार यांच्या घरात कोणाचे आई वडील आजारी, तर कोणाचे बायकोचा दवाखाना तर कोणाच्या लेकराचं शिक्षण तर कोणाचं पोटच फक्त या कामावर अवलंबून आहे.

म्हणून साहेबाना विनंती आहे लवकर आमची पगार (पेमेंट) करावी आपल्या माहितीस्तव असे निवेदन देऊन यावर काही दखल घेण्यात नाही आली तर आम्ही सर्व कामगार केज सब डिव्हिजन मध्ये पासुन दि. १३/०७/२०२४ पासून काम बंद आंदोलन करणार आहोत. व १६/०७/२०२४ पासून मंडळ कार्यालय बीड या ठिकाणी आमरण उपोषण केज सब डिव्हिजन मधील ४२ कामगार करणार आहोत जो पर्यंत तीन महिन्याचे पेमेंट मिळत नाही तोपर्यंत उपोषण चालू राहील यामध्ये काही अनुसूचित प्रकार घडला तर याची सर्वस्व जबाबदारी आपल्या कार्यालयाचे अधिकारी प्रशासनानाकडे असेल. आज आमच्या परिवारावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे असे निवेदनाद्वारे ४३ कंत्राट कामगारांनी म्हटले आहे तरी संमंधीत प्रशासनाने कंत्राट कामगारांच्या निवेदनाची दखल घ्यावी अशी मागणी कंत्राट कामगारांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# महाराष्ट्रात 'भारतरत्न संघर्ष' यात्रा काढणार-अजिंक्य चांदणे




बीड । प्रतिनिधी

साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना साहित्य क्षेत्रातील भारत रत्न देण्यात यावा,यासाठी महाराष्ट्रात भारतरत्न संघर्ष यात्रा काढणार असल्याची घोषणा डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी सोलापूर येथून केली.

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाची सोलापूर येथे राज्यस्तरीय महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा. यासाठी महाराष्ट्रात संघर्ष यात्रा काढली जाणार असल्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय डीपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत राज्यातून सर्व जिल्हाध्यक्ष व राज्य पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला. साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्रातील नामांकित साहित्यिक आहेत. त्यांची साहित्य क्षेत्रात उपेक्षा झाली.असे चित्र तयार करण्यात आले. परंतु जगातील २७ भाषांमध्ये ज्यांचे साहित्य लिहिले गेले. त्यांना भारतरत्न का मिळू नये यासाठी ही संघर्ष यात्रा महाराष्ट्रात निघणार आहे. अशी माहिती अजिंक्य चांदणे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त बैठक

पाटोदा । प्रतिनिधी

शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉईंट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षपदी तुकाराम वाघमारे. ऊर्फ तात्या, उपाध्यक्ष बाळासाहेब दोडके, परमेश्वर शिंदे सचिव, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

या वेळी उपस्थित नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड, जिल्हा परिषद पॉइंट बीड चे अध्यक्ष राजु भाऊ भोसले, अशोक थोरात, विनोद वडमारे, राजरतन वडमारे, संदीप भांबे, जालिंदर पाखरे, नवनाथ डावकर, सुनील काळे, रंजीत वाघमारे, अमोल लोखंडे, जालिंदर वारे, अशोक क्षीरसागर, राजू वाघमारे, भगवान पंधारे, कैलास वंजारे, शंकर मोरे, बाबा शेळके, रजाक पठाण, जमील शेख, नवी पठाण, संजय पायगुडे, बाबा शिंदे, तात्या कदम, राजेश चव्हाण, हनुमंत ननवरे, विनोद मस्के, अशोक राठोड, परमेश्वर पवार, कृष्णा राठोड, गिरधारी मोरे, सुनील काळे, अभिमान डोंगरे, गोरख ठोकरे, दादा शिंदे, उगले मामा, हनुमान जगदाळे, काळकुटे, प्रवीण सुदामे, ऋषिकेश बेदरे, धर्मेंद्र शिंदे, भरत सांगोळे, मोहन वाघमारे, विकास गोटे, जय राम बांगर, अण्णा शिणगारे, अंगद धनवे, दादा ढवळे, अमोल जोगदंड, नितीन मुंडे, प्रमोद वडमारे, व शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉइंट बीड या सर्वांच्या सर्वानुमते ही निवड करण्यात आलेली आहे व इत्यादी उपस्थित होते.

# महापुरुषांच्या स्मारकाचा ठराव म्हणजे लबाडाचे आवतन-होके पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

> कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वाराला जर स्व.सुंदरराव सोळंके यांचे नाव देयचे असतेतर आ.सोळंके यांनी आडत बाजार पेठ फुले पिंपळगाव या मुख्य आवारात जाण्यापूर्वीच बाजार समिती संचालक मंडळाला आदेश देऊन लोकनेते स्व.सुंदरराव सोळंके मार्केट यार्ड या नावाचे टोलेजंग प्रवेशद्वार उभारले असते.

आ.प्रकाश सोळंके यांच्या गेल्या विस वर्षांपासून ताब्यात असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने आ.सोळंके यांच्या आदेशावरून विधानसभा निवडणुक डोळ्यासमोर ठेऊन माजलगाव मुख्य बाजार आवार फुलेपिंपळगाव या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचा दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत ठराव घेतला आहे परंतु हा ठराव म्हणजे लबाडाचे आवतन जेवल्याशिवाय खरं नाही असा आरोप काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात ते म्हणाले ज्या माजी.सभापती स्व.दादासाहेब रांजवन यांनी त्यांच्या कार्यकाळात अथक परिश्रम घेऊन कृषी उत्पन्न बाजार समितीला अव्वल स्थानी आणुन ठेवले व कोणताही स्वार्थ न ठेवता माजलगाव सह उप बाजार पेठ असलेल्या टाकरवण, वडवणी, सिरसाळा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जमिनी खरेदी करून बाजार समितीचा नावलौकिक वाढवला, प्रगती केली त्यांच्या त्या कार्याचा गौरव म्हणून स्व.दादासाहेब रांजवन यांच्या नावाने प्रवेशद्वार उभारण्यात यावे यासाठी अनेक वेळा कित्तेक सामाजिक संघटनांनी, काँग्रेस पक्षाने लेखी निवेदन दिले परंतु यावर दोन वर्षांपूर्वी केवळ ठराव घेण्याचे काम केल मात्र त्यावर अद्याप पर्यंत प्रवेशद्वार उभारणीसाठी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही त्यामुळे हा फक्त आ.सोळंके यांनी आपल्यावर नाराज असलेला मराठा व दलीत समाज यांची नाराजी कमी करण्याच्या हेतूने महापुरुषांच्या स्मारक उभारणीचा नाटकी ठराव घेण्याच फर्मान सोडल्याच दिसून येत आहे पण हा ठराव म्हणजे लबाडाचे आवतन जेवल्याशिवाय खरं नाही असेही काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील यांनी म्हटले आहे.

# प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेत मोठा भ्रष्टाचार; गोरगरीबांचे कनेक्शन दिले दुसऱ्यांना

## दोषी गॅस एजन्सी वितरकांचे परवाने रद्द करा

बीड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचे तसेच गोरगरिबांचे गॅस कनेक्शन दुसऱ्यांना दिल्याचे निदर्शनास येत आहे. याविषयी सखोल चौकशी करून दोषी गॅस एजन्सी वितरकांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात यावे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, मोहज़ीब इनामदार, शेख रईसोद्दीन आणि इरफ़ान बागवान यांनी दिला आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, काही वर्षांपूर्वी केंद्र शासनाकडून गोरगरीब कुटुंबीयांकरीता प्रधानमंत्री उज्वला गॅस योजना राबविण्यात आली होती. शासनाच्या धोरणानुसार या योजनेतून वितरण करण्यात आलेल्या गॅस कनेक्शन ची आता केवायसी करण्याचे आदेश आले आहेत. म्हणून या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री उज्वला गॅस कनेक्शन ज्यांच्या नावावर दिलेले आहेत, त्यांना केवायसी करून घेण्यासाठी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर मेसेज येऊ लागले आहेत आणि इथेच नेमका घोटाळा झाला. गॅस एजन्सी वितरकांनी सर्वसामान्य गोरगरीब निरक्षरांचे गॅस कनेक्शन स्वतःच्या तसेच पुढार्यांच्या सोबत मिळून संगनमताने जवळच्या



लोकांना दिले. गोरगरिबांच्या नावाने मिळालेले गॅस कनेक्शन घेतल्यापासून आतापर्यंत हा धंदा बिनबोभाट चालू होता. परंतु आता केवायसी करावी लागत असल्याने ज्यांच्या नावाने गॅस कनेक्शन देण्यात आले आहे, त्यांच्या मोबाईलवर जेव्हा यासाठी मेसेज पडू लागले तेव्हा एकच खळबळ उडू लागली आहे. अनेकांना तर ४४० व्होल्ट चा झटका लागावा त्याप्रमाणे करंट लागत आहे. कारण प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत ज्यांनी गॅस कनेक्शन घेतलेच नाही अशा सर्वसामान्य गोरगरीब व अशिक्षितांना केवायसी करून घेण्याचे मेसेज येत असल्याने अनेक जण गॅस एजन्सी मध्ये जाऊन जेव्हा विचारपूस करू लागले तेव्हा हा सर्व प्रकार उघडकीस येऊ लागला आहे. जेव्हा प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत गॅस कनेक्शनचे वितरण केले जात होते तेव्हा खऱ्याखुऱ्या गरजवंत गोरगरिबांपेक्षा गॅस एजन्सी वितरकांनी अशा लोकांऐवजी भलत्यांनाच गॅस कनेक्शन दिलेले आहे. त्यात अनेक राजकीय कार्यकर्ते आणि पुढाऱ्यांचाही समावेश आहे. गॅस वितरकांसह कार्यकर्ते आणि पुढार्यांनी मिळून एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या धोरणानुसार संगनमताने गट्टी जमवून धनदांडग्यांना गॅस कनेक्शन दिले आहे. ज्यांनी प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत चोरट्या मार्गाने गॅस कनेक्शन मिळविले असे लोक या कनेक्शनच्या माध्यमातून मिळालेले गॅस सिलेंडर घरांसोबतच चार चाकी गाड्या, तीन चाकी ऑटो रिक्षात सर्रासपणे गॅस वापरू लागले आहेत. हा सर्व उद्योग आतापर्यंत बिनबोभाट सुरू होता परंतु आता केवायसी करावी लागत असल्याने याचे बिंग फुटू लागले आहे. प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येत असून खरेखुरे गरजवंत सर्वसामान्य गोरगरीब अशिक्षित या योजनेतून मिळणाऱ्या गॅस कनेक्शन पासून वंचित राहिले आहेत. अशा लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांच्या नावे वितरित करण्यात आलेले गॅस कनेक्शन त्यांना मिळवून देण्यासाठी, गॅस एजन्सी वितरकांकडून व पुढार्यांकडून या योजनेत करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी. योजनेत भ्रष्टाचार केलेल्या गॅस एजन्सी वितरकांचे परवाने रद्द करण्यात यावेत. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनातून एस.एम.युसूफ़, डॉ. संजय तांदळे, मोहज़ीब इनामदार, शेख रईसोद्दीन आणि इरफ़ान बागवान यांनी दिला आहे.

# मराठा शांतता रॅलीत पँथर सेनेकडून पाणी,नाष्ट्याची सोय




पाटोदा । प्रतिनिधी

बीडमध्ये मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची शांतता रॅली काढण्यात आली होती या रॅलीत बीड जिल्ह्यासह आजूबाजूच्या जिल्ह्यातून मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता या रॅलीत मराठा बांधवांची गैरसोय होऊ नये यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेकडून पाणी व नाष्टाची उत्तम सोय जिल्हा परिषद येथे स्टॉल लावून करण्यात आली होती.

अशी माहिती ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष नितीन सोनवणे यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकातून दिली ऑल इंडिया पँथर सेना सुरुवातीपासूनच सामाजिक प्रश्नांवर अन्याय अत्याचारावर आवाज उठवण्याचे काम करत आलेली आहे तसेच मराठा आरक्षणासाठी करोडोचे मोर्चे काढणारे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात त्या त्या ठिकाणी पक्षाचे कार्यकर्ते आपला सहभाग नोंदणीत आले आहेत ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांच्या मार्गदर्शनाखाली बीडमध्ये मराठा समाज बांधवांच्या मोर्चात पाणी व नाश्ता याची सोय करून ऑल इंडिया पँथर सेनेने सामाजिक बंधुभाव जोपासला आहे.

या कार्यक्रमास नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना, वसीम भाई शेख, ज्ञानेश्वर कवठेकर, सुधीर कतले, गुड्डू जावळे, राजेश चव्हाण, मोबीन शेख, व संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

cmyk

# परिश्रमातून यशाचे शिखर गाठता येते -डॉ.योगेश क्षीरसागर

## कागदावरील गुणापेक्षा रक्तातील गुणांना वाव द्यावा -प्रशांत कदम; नवगण, विनायक शिक्षण संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार





**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेताना पालक, गुरुजनांचे संस्कार न विसरता समाजात प्रतिमा निर्माण करावी. भविष्यात नवगण व विनायक युवक कल्याण संस्थेच्या माध्यमातून आणखी शाळा, महाविद्यालये सुरू करण्याचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन संस्थेचे सहसचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. तसेच, विद्यार्थ्यांनी कागदावर पडलेल्या गुणांना महत्त्व न देता रक्तातल्या गुणांना वाव देण्याची गरज आहे. विद्यार्थांनी प्रामाणिकपणे अभ्यास करत राहावे. आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले.

येथील नवगण शिक्षण संस्था, विनायक युवक कल्याण संस्थेत शिक्षण घेऊन १० वी, १२ वी, नीट, एम.एच.टी.सी.ई.टी., जे.ई.ई. परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसह पालकांचा सत्कार सोहळा शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयातील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर क्रीडा संकुल व सांस्कृतिक सभागृहात शनिवारी (दि.१३) पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. योगेश क्षीरसागर तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशांत कदम हे बोलते होते.

व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष किशोर काळे, ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तमराव पवार, पिपल्स एज्युकेशन संस्थेचे सचिव मुस्ताक अन्सारी, संस्थेच्या संचालिका डॉ.सारिकाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, विद्यार्थी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष शाकेर झकेरिया, शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्षा डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली नवगण शिक्षण संस्था, विनायक युवक कल्याण संस्थेचा नावलौकिक होत आहे. या संस्थेतून विविध परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप देण्यासाठी दरवर्षी सत्कार समारंभ सोहळा आयोजित केला जातो. सामाजिक जाणीव ठेऊन विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिल्याने प्रेरणा मिळत असते. संस्थेतून दरवर्षी जवळपास २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात उच्च पदावर काम करत आहेत. आजच्या डिजिटल स्मार्ट युगात शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर कोणत्या क्षेत्रात जावे हे पालकांपेक्षा विद्यार्थांना अधिक माहिती आहे. विद्यार्थांना चांगले काय, वाईट काय हे समजावून सांगणे खूप महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी चिकाटी, मेहनत, शिस्त या माध्यमातून यशाचे शिखर गाठावे, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या. पुढे बोलताना प्रशांत कदम म्हणाले की, विद्यार्थांनी आपल्यातील कलागुणांना वाव देऊन आपले छंद जोपासले पाहिजेत. नवगण शिक्षण, विनायक युवक कल्याण संस्थेच्या माध्यमातून जवळपास ७०० कुटुंब आपले उदरनिर्वाह करत आहेत. त्यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर हे सर्वात मोठे कुटुंब प्रमुख आहेत. विद्यार्थांना शिक्षणाबरोबर आपल्या जीवनाचा अर्थ कळला पाहिजे हीच चांगल्या संस्थेत शिकल्याची लक्षणे असल्याचे मत प्रशांत कदम यांनी व्यक्त केले. दरम्यान, डॉ.योगेश क्षीरसागर, प्रशांत कदम यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थांना स्मार्ट वॉच, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या समारंभासाठी नवगण शिक्षण संस्था, विनायक युवक कल्याण संस्थेचे सर्व संचालक, सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक वर्ग उपस्थित होते.

## आषाढी एकादशीला बीड ते नारायणगड पायी दिंडीत सहभागी व्हा -भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील सुप्रसिद्ध भागवताचार्य सचिनजी महाराज सपकाळ यांच्या राधेश्याम सामाजिक प्रतिष्ठानचा गेल्या तीन वर्षांपासून दर महा एकादशीला बीड ते नारायणगड दिंडी सोहळा अविरत सुरू आहे आणि या वर्षीसुद्धा मासिक शुध्द एकादशीतील आषाढी एकादशीला बीड ते नारायणगड पायी दिंडी सोहळ्याचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले असून बुधवार दि.१७ जुलै रोजी सकाळी ठिक ७ वाजता राधेश्याम संगीत विद्यालय खडकपूरा चौक येथून या दिंडीचे प्रस्थान होणार आहे.पुढे रविवार पेठ-डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक- सुभाष रोड- सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स- अण्णाभाऊ साठे चौक- छत्रपती शिवाजी महाराज चौक- बस स्टँड च्या पाठीमागे- सम्राट चौक- अंबिका चौक पांगरी रोड मार्गे ही दिंडी श्री क्षेत्र नारायण गड येथे पोहोचणार आहे. या दिंडीमध्ये सहभागी वारकऱ्यांच्या सेवेसाठी शुद्ध पाण्याचे जार, साबुदाणा खिचडी, टाळ, मृदंग, वीणा, ढोल पथक व उत्कृष्ट साऊंड सिस्टीमचे नियोजन करण्यात आले असून बीड शहरातील सर्व भाविक भक्तांनी आषाढी एकादशीच्या महापर्वकाळी संत संगती व नामस्मरणात तल्लीन होण्यासाठी बीड ते नारायणगड पायी दिंडी सोहळ्यात आपली नाव नोंदणी करून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती राधेश्याम सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा दिंडी प्रमुख भागवताचार्य सचिनजी महाराज सपकाळ यांनी केली आहे.

## २२ जुलै रोजी ठेवीदारांसह रास्तारोको करणार -प्रा.सचिन उबाळे

### पोलिस अधीक्षक कार्यालयात ठेवीदारांसह मांडला ठिय्या

**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानराधा,साईराम, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), लक्ष्मीमता अर्बन,जिजाऊ मल्टीस्टेटचे अध्यक्ष बबन शिंदे,साईनाथ परभणे, चंदुलाल बियाणी तसेच ज्ञानराधाचे उपअध्यक्ष यशवंत कुलकर्णी, परमेश्वर राठोड,तसेच सर्व मल्टिस्टेट पतसंस्थांच्या संचालक मंडळांना अटक करावी व ठेवीदारांच्या ठेवी तात्काळ मिळाव्यात या साठी पोलिस प्रशासनाला पंधरा दिवसांचा अिल्टमेटम स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन भैय्या उबाळे यांनी ३ जुलै रोजी देत उपोषण मागे घेतले होते. दरम्यान शुक्रवारी (दि.१२) प्रा.उबाळे यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयात ठेवीदारांसह ठिय्या मांडला. या नंतर पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची भेट घेतली. यावेळी उबाळे यांनी पोलिसांनी दिलेले आश्वासन पंधरा दिवसांत पूर्ण करावे नसता २२ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठेवीदारांसह रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा प्रा. सचिन उबाळे यांनी दिला आहे. दरम्यान २० जुलै रोजी बीड येथे मराठवाड्यातील सर्व ठेवीदारांची महत्वपूर्ण बैठक आयिोजत केली असल्याचे उबाळे यांनी सांगितले.



**२० जुलै रोजी मराठवाड्यातील ठेवीदारांची बैठक**

**आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव) परळी पीपल्स या पतसंस्थांमध्ये बीडसह मराठवाड्यातील ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. यामुळे आगामी रणनिती ठरविण्यासाठी २० जुलै रोजी बीड येथे मराठवाड्यातील ठेवीदारांची महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे प्रा.उबाळे यांनी सांगितले.**

जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव) परळी पीपल्स यांच्या विरोधात स्वाभिमान संघटनेचे जिल्हाप्रमुख प्रा.सचिन उबाळे यांचे उपोषण ३ जुलै रोजी प्रशासनाच्या मध्यस्तीने तत्पुरते स्थगित करण्यात आले होते. यावेळी साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट

◀◀ पान ३ वर



## आमदार पंकजाताईंचे अभिनंदन..!

**बीड । प्रतिनिधी**

भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या मा.आ. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत घवघवीत यश मिळाले.

भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी मुंबई येथे भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करून पुढील राजकीय वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## महावितरणमधील कंत्राटी कामगारावर उपासमारीची वेळ

### १६ तारखेपासून ४२ कामगारांचे आमरण उपोषण करणार

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील हातावर पोट असणारे अनेक महावितरण कंत्राट कामगारावर तीन महीण्या पासुन पगार नसल्याने उपास मारीची वेळ आली आहे त्यामुळे १६/०७/२०२४ पासुन ४३ कंत्राट कामगार बीड मंडळ कार्यालय येथे अमरण उपोषणाला बसणार आहेत याविषयी सविस्तर वृत्त असे की सर्व वीज कंत्राटी कामगार केज विभाग यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे की  कि आम्हांला माहे,एप्रिल, में, जून, तीन महिन्याचे पगार (पेमेंट) अजून झाले नाही. ३महिने आमची पगार झाली नाही आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. ३ महिने पगार नसल्यामुळे आम्ही आमच्या घरात किरान भरु शकत नाही ३ महिने पगार नसल्याने घरातील व्यक्ती आजारी पडल्यावर आमच्याकडे उपचारासाठी पैसे नाहीत ३ महिने पगार नसल्याने मुलांच्या शिक्षनाचा खर्च करू शकत नाही ३ महिने पगार नसल्याने स्वतःच्या तबियत ची काळजी घेऊ शकत नाही ३ महिने पगार नसल्याने आई वडिलांना मेडिकल गोळ्या देऊ शकलो नाही एक आवर्जून विनंती, आम्हा कामगार यांच्या घरात कोणाचे आई वडील आजारी, तर कोणाचे बायकोचा दवाखाना तर कोणाच्या लेकराचं शिक्षण तर कोणाचं पोटच फक्त या कामावर अवलंबून आहे, म्हणून साहेबाना विनंती आहे लवकर आमची पगार (पेमेंट) करावी आपल्या




माहितीस्तव असे निवेदन देऊन यावर काही दखल घेण्यात नाही आली तर आम्ही सर्व कामगार केज सब डिव्हिजन मध्ये पासुन दि. १३/०७/२०२४ पासून काम बंद आंदोलन करणार आहोत. व १६/०७/२०२४ पासून मंडळ कार्यालय बीड या ठिकाणी आमरण उपोषण केज सब डिव्हिजन मधील ४२ कामगार करणार आहोत जो पर्यंत तीन महिन्याचे पेमेंट मिळत नाही तोपर्यंत उपोषण चालू राहील यामध्ये काही अनुसूचित प्रकार घडला तर याची सर्वस्व जबाबदारी आपल्या कार्यालयाचे अधिकारी प्रशासनानाकडे असेल. आज आमच्या परिवारावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे असे निवेदनाद्वारे ४३ कंत्राट कामगारांनी म्हटले आहे तरी संमंधीत प्रशासनाने कंत्राट कामगारांच्या निवेदनाची दखल घ्यावी अशी मागणी कंत्राट कामगारांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब, यांच्या आशीर्वादाने शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने तसेच मराठवाडा संपर्क नेते अर्जुनजी खोतकर साहेब, जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. विजय पाटील, विधानसभा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या सूचनेवरून दि. १३ जुलै रोजी शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालय जालना रोड, बीड येथे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पदाधिकाऱ्यांची जिल्हा बैठक पार पडली. या बैठकीमध्ये जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक तथा सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना शिवसेना सदस्य नोंदणी अभियाना विषयक मार्गदर्शन केले. बीडमध्ये शिवसेना सदस्य नोंदणी जास्तीतजास्त प्रमाणात करा असे आवाहन केले. याबरोबरच अनिलदादा जगताप यांनी आपल्या सर्वांचे नेते तथा महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री दिवसरात्र काम करत आहेत, आपले जनतेप्रती असणारे कर्तव्य पार पडत आहेत. यामुळे आपण देखील सर्वांनी त्यांच्या कार्याला प्रेरित होऊन पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी योगदान द्यायला हवं. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यापेक्षा सर्वाधिक सदस्य नोंदणी अभियान बीड जिल्ह्यात राबविण्यात यायला हवे असे जिल्हप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मार्गदर्शन सूचना केल्या. दरम्यान परमेश्वर डाके यांची शिवसेना शेतकरी सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी



**बीडमध्ये शिवसेनेची जिल्हा बैठक संपन्न**

## अक्षरगंगा प्रज्ञा शोध राज्यस्तरीय परीक्षेत मिळवलेल्या याच्याबद्दल अर्जुने भगिनीचा गौरव

**माजलगाव । प्रतिनिधी**

अक्षरगंगा प्रज्ञाशोध राज्यस्तरीय परीक्षेत अर्जुने भगिनीने यश मिळवल्याने त्यांचा सांगली येथे मानचिन्ह सन्मानपूर्वक देऊन गौरवण्यात आले.२०१९ मध्ये झालेल्या अक्षरगंगा प्रज्ञाशोध परीक्षेत आनिल अर्जुने हीने ३०० मार्क पैकी २८४ मार्क घेऊन राज्य पातळीवर ९५ टक्के मार्क घेत २ सिल्वर मेडल रँक मिळविली तर बहीन अरोही अनिल अर्जुने हिने याच परीक्षेत ३०० पैकी २२४ मार्क घेउन राज्य पातळीवर ९ सिल्वर मेडल रँक मिळविली होते.

या विषयी आधिक माहिती आशी कि, वरील दोन्ही गुली सतत कोणत्या कोणत्या स्पर्धा परिक्षेत यश संपादन करीत आसतात या आगोदर महाराष्ट्र स्टॅलेंट सर्च परीक्षेत राज्य पातळीवरील गुणवत्ता यादीत अनुक्रमे १० वा व १२ वा कृमांक मिळविला होता धाराशिव (उस्मानाबाद) येथिल श्रीपतराव भोसले हायस्कुल मध्ये आवनी ही ७ वी मध्ये शिक्षण घेत आसुन आरोही ही ३ रीच्या वर्गात नुतन प्राथमिक विद्या मंदिर येथे शिक्षण घेत आहे आई वडिल दोथेही शिक्षक आसून तेच यांचा अभ्यास घेतात तसेच शिक्षक नेते उत्तम ◀◀ पान ३ वर




## किरण शिनगीरे यांच्या मागणीला यश

### चंद्रकांत दादा पाटील यांच्याकडे केली होती मागणी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी- आष्टी तालुक्यातील वटणवाडी येथील युवा सामाजिक कार्यकर्ते किरण भगवानराव शिनगीरे यांनी नुकतीच राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री माननीय नामदार चंद्रकांत दादा पाटील यांना ई-मेल च्या माध्यमातून पत्र पाठवून मुलींना उच्च शिक्षण मोफत या निर्णयाची अंमलबजावणी होण्याबाबतची मागणी केली होती. अखेर या मागणीला यश आले आहे. सदरील निर्णयाचा जीआर काढल्याबद्दल त्यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा.चंद्रकांत दादा पाटील यांचे आभारी व्यक्त केले आहेत. तसेच किरण शिनगीरे यांच्या मागणीमुळे त्यांचे विद्यार्थिनींसह, विविध स्तरातून कौतुक होत आहे.



## गेवराई तालुका खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदी जयदीप औटी यांची तर उपाध्यक्षपदी गणपत राठोड यांची बिनविरोध निवड

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुका खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदी जयदीप औटी यांची तर उपाध्यक्षपदी गणपत राठोड यांची निवड करण्यात आली. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.

गेवराई तालुका खरेदी विक्री संघा अध्यक्षपदासाठी आज बैठक बोलविण्यात आली होती. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, माजी सभापती कुमारराव ढाकणे यांच्यासह खरेदी विक्री संघाचे संचालक सर्वश्री सुनिल देशमुख, श्रीराम आरगडे, देवराव यमगर, दिनकर पघळ, हनुमान मावस्कर, दिनकर काळे, सतिष नलवडे, हनुमान गोडसे, सखाराम ढाकणे, सोमेश्वर गचांडे, जनार्धन पांचाळ, बळीराम साबळे, शेख रफिक, श्रीमती मोहराबाई डरफे, श्रीमती विमल कोंढरे आदी उपस्थित होते. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदासाठी एकच अर्ज आल्यामुळे जयदीप औटी यांची ◀◀ पान ३ वर



**अमरसिंह पंडित यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आयएएस पूजा खेडकरांच्या अडचणीत वाढ
# पुण्यातील बंगल्यावर नोटीस, केवळ ७ दिवसांची मुदत

**पुणे । प्रतिनिधी**

कोट्यवधींची संपत्ती, अलिशान कार, गाडी, बंगला, फ्लॅटस आणि आरामदायी लाईफस्टाईल असतानाही नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र मिळवलं. अंध-अपंगांच्या प्रमाणपत्रावर सनदी अधिकारी बनल्या, तरीही कार चालवून कार्यालयात जातात, विविध खोट्या प्रमाणपत्रांचा आधार घेऊन आयएएस अधिकारी बनलेल्या पूजा खेडकर यांचे अनेक कारनामे समोर येत आहेत. वडिलांच्या पाऊलावर पाऊल टाकत अधिकारी होण्याचं स्वप्न पूजा खेडकर यांनी बाळगलं, पण त्यासाठी गैरमार्गाचा वापर केल्याचं आता समोर येत आहे. त्यातच, त्यांच्या मातोश्रींचाही एक दमदाटी करण्यात येत असल्याचा बंदुकधारी व्हिडिओ समोर आला होता. तसेच, पुण्यातील बाणेर रोडवरील बंगल्याच्या जागेत त्यांनी अनधिकृतपणे सरकारी जागेवर अतिक्रमण केल्याचं उघडकीस आलं आहे. आता, याप्रकरणी पुणे महापालिकेनं त्यांच्या घरावर नोटीस चिटकवली आहे.

खेडकर कुटुंबीयांकडून पुण्यातील बाणेर भागातील त्यांच्या बंगल्याच्या बाहेर असलेल्या फुटपाथवर अतिक्रमण करण्यात आलंय. फुटपाथवर कठडे करून त्यात झाडें लावण्यात आली आहेत. खेडकर कुटुंबाचे एकामागोमाग एक कारनामे उघड झाल्यानंतर पुणे महापालिकेने हे अतिक्रमण काढून टाकण्याची नोटीस खेडकर यांच्या बंगल्यावर चिकटवली आहे. खेडकर कुटुंबीयांनी पुढील ७ दिवसांत अतिक्रमण काढून न घेतल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे, आता खेडकर कुटुंबीयांना ७ दिवसांत बाणेरच्या बंगल्यासमोरील अतिक्रमण हटवावे लागणार आहे, अन्यथा कारवाई अटळ आहे.



**पूजा खेडकर अकोल्यात प्रकल्प अधिकारी**

पूजा खेडकर ह्या पुणे इथं प्रशिक्षणार्थी काळात वादाच्या भोवऱ्यात अडकल्या होत्या. त्यानंतर पूजा खेडकर यांना प्रशिक्षणार्थी म्हणून वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयावर सहायक जिल्हाधिकारी म्हणून ११ जुलै रोजी रुजू झाल्या आहेत. पहिल्याच दिवशी त्यांनी वाशिमच्या जिल्हाधिकारी एस.बूवनेश्वरी यांची भेट घेऊन वाशिमच्या जलसंपदा विभागासह १२ जुलै रोजी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे प्रशिक्षण घेतले. इथून पुढे आठवड्याचे पहिले दिवशी म्हणजेच सोमवार १५ जुलै पासून १९ जुलैपर्यंत अकोला येथील प्रकल्प अधिकारी आदिवासी विभाग म्हणून आठवडाभर कामकाज प्रशिक्षण करिता हजर होणार आहेत. त्यानंतर २२ जुलै पासून विविध शासकीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्या कामकाजाचा अनुभव घेणार आहेत.

पुजा खेडकर यांनी दिव्यांग असल्याचं सर्टिफिकेट मिळवलंय ते अहमदनगर जिल्हा रुग्णालयातुन. २०२१ साली मिळवलेल्या या सर्टिफिकेटमध्ये त्यांना दृष्टीदोष असल्याचं आणि मानसिक विकलांगता असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे अहमदनगरच्या या जिल्हा रुग्णालयांतील तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सकांची चौकशी करण्याची मागणी आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केलीय.

**अंध व्यक्तीचं प्रमाणपत्र कसं मिळवलं?**

वादग्रस्त प्रशिक्षार्थी आयएएस अधिकारी पुजा खेडकर या दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रीय दृष्टीहीन संघाकडून करण्यात आली आहे. पुजा खेडकर यांनी जर अंध असल्याचं खोटं प्रमाणपत्र सादर केलं असेल तर त्यांनी एका खऱ्या अंध व्यक्तीवर अन्याय केलाय, असं या संघटनेचे सदस्य असलेल्या अंध व्यक्तींच म्हणणं आहे. एखाद्या व्यक्तीला किमान चाळीस टक्के दृष्टीदोष असला तरच त्या व्यक्तीला दिव्यंगत्वाचे प्रमाणपत्र मिळते आणि अशी व्यक्ती कार चालवणं तर दुरच, पण लिहू-वाचू देखील शकत नाही, असेही या अंध व्यक्तींच म्हणणं आहे. त्यामुळे पुजा खेडकर यांनी प्रमाणात कसं मिळवलं असा प्रश्न आता अंध संघटनेने विचारला आहे.

**पूजा खेडकर यांची चौकशी**

पूजा खेडकर प्रकरणी एक सदस्य समिती स्थापन करण्यात आली आहे. जर या समितीच्या तपासात खेडकर दोषी आढळून आल्या तर पूजा खेडकर यांची गच्छंती अटळ असल्याची माहिती आहे. पूजा खेडकर यांनी सादर केलेल्या दस्तावेजांची तपासणी या समिती मार्फत केली जाणार आहे. नॉन क्रिमिनल आणि मेडिकल दृष्टी दोष चाचणी कोणी केली होती, ज्या रहिवासी भागातून जे प्रमाणपत्र देण्यात आलं त्याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई केली जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोमवार किंवा त्यानंतर या प्रकरणात कारवाई केली जाऊ शकते.

## पंडिता रमाबाई मुक्ती मिशन येथे ४ मुलींचा विनयभंग, व्यवस्थापकाला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील केडगाव येथील पंडिता रमाबाई मुक्ती मिशन येथे तीन अल्पवयीन आणि एका सज्ञान मुलींचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात व्यवस्थापक म्हणून कार्यरत असणाऱ्या भास्कर निरगट्टी (वय-५३) याच्यावर गुन्हा दाखल करुन अटक केली आहे, अशी माहिती यवत पोलिसांनी दिली आहे.

नुकत्याच धर्म परिवर्तनाच्या मुद्यावरुन विधानसभेत लक्षवेधी ठरलेल्या केडगाव येथील ख्रिश्चन संस्था पंडिता रामाबाई मुक्ती मिशन यामध्ये आणखी दुसरा प्रकार घडल्याने पुणे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. ही संस्था अनाथ अंध अपंग मुलींना शिक्षणासाठी रहिवास व मोफत शिक्षण उपलब्ध करुन देते. त्या विद्यार्थिनींचे संगोपन, शिक्षण व नोकरी अशा सर्व गोष्टी संस्थेमार्फत अनेक वर्षापासून केले जात आहे.

संस्थेची खासगी व सरकारी याच परिसरात शाळा आहे. संस्थेमध्ये अनेक महिला राहत असून त्यामध्येच अकाउंट सांभाळणाऱ्या व्यवस्थापकाने विनयभंग केल्याप्रकरणी येथील समुपदेशक म्हणून कार्यरत असलेल्या महिलेने यवत पोलिसांकडे तक्रार दिली आहे. त्यानंतर दौंडचे उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप, पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

गुन्हा १७ एप्रिल रोजी घडला असून १२ जुलै रोजी यवत पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

करण्यात आला आहे. दौंड तालुक्यातील या प्रकरणाने या संस्थेत काम करणाऱ्या या आरोपीवर कठोर कारवाई

करावी अशी मागणी अनेक सामाजिक संस्थांद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## मंचर बसस्थानकात प्रवाशाचे अडीच लाखांचे दागिने चोरले

**मंचर । प्रतिनिधी**

येथील एसटी बसस्थानकाच्या आवारात एसटीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशाच्या बॅगमधून दोन लाख ४३ हजार १६० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरट्याने लांबविले.

मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (ता. १२) मंचर एसटी बसस्थानकाच्या आवारात बोरी बुद्रुक ते मुंबई एसटीमध्ये रवींद्र हरिभाऊ कोरडे (वय ३६, मूळ रा. बोरी बुद्रुक-शिरोली, ता. जुन्नर; सध्या जुईनगर, नवी मुंबई) हे बसले होते. सर्व दागिने त्यांनी बॅगमध्ये भरून ठेवले होते. गर्दीचा गैरफायदा घेऊन बॅगची चेन उघडून बॅगमधील सोन्याचे दागिने चोरट्याने चोरी करून नेले. याप्रकरणी पुढील तपास मंचर पोलिस ठाण्याचे सहाय्यक फौजदार गणेश डावखर करत आहेत. दरम्यान, मंचर शहरात दुचाकी वाहने व बंद सदनिकेतील चोऱ्यांच्या घटना थांबता थांबेना. या भागातील नागरिक त्रस्त झाले आहेत. मंचर बस स्थानकावर साध्या वेशातील पोलिसांचा बंदोबस्त तैनात करावा, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

## रावेत येथील पीसीसीओईआर च्या एनएसएस विभागाचे वृक्षारोपण, दुर्ग स्वच्छता मोहीम

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च मधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जुन्नर तालुक्यातील किल्ले जीवधन, घाटघर येथे वृक्षारोपण कार्यक्रमांमध्ये ५० जंगली झाडांच्या रोपांची लागवड करण्यात आणि १२०० सीड बॉलचे रोपण करण्यात आले. तसेच दुर्ग भेट व परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

पीसीसीओईआर चे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या शिबिरात इतिहास संशोधक अमर गायकवाड यांनी जीवधन किल्ल्याचा इतिहास सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम



अधिकारी डॉ. महेंद्र साळुंके, टीम महाराष्ट्र रेंजर्सचे प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. अश्विनी भावसार, जुन्नर वन विभागाचे प्रदीप चव्हाण, राजेंद्र गायकवाड आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय हे शैक्षणिक उपक्रमांबरोबरच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आघाडीवर असते.

## रमाबाई मुक्ती मिशन संस्थेच्या लेखापालला ३ मुलींच्या विनयभंग प्रकरणी अटक

दौंड । प्रतिनिधी

तीन अल्पवयीन मुलींचा विनय भंग केल्याप्रकरणी केडगावच्या (ता.दौंड) पंडिता रमाबाई मुक्ती मिशनच्या लेखा विभागाचे प्रमुख (मुख्य अकाउंटंट) भास्कर निरुगट्टी (वय ५४) यांच्यावर बाललैंगिक अत्याचार आणि महिला अन्याय अत्याचार (३५४) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. संस्थेने याबाबत यवत पोलिसात १२ जुलै रोजी गुन्हा दाखल केला आहे. त्याला यवत पोलिसांनी ताब्यात घेतले असून न्यायालयात हजर केले असता त्याला ४ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आलेली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जागतिक पातळीवरील अंध, अपंग, मतिमंद यांच्यासाठी कार्यरत असणाऱ्या केडगाव येथील पंडिता रमाबाई मुक्ती मिशनमध्ये अल्पवयीन मुलींवरती याच संस्थेच्या लेखा विभागातील प्रमुखाने संस्थेच्या आवारात असलेल्या एलिम गार्डनमध्ये तीन मुलींचा विनयभंग केल्याची घटना एप्रिल महिन्यातील १७ तारखेला घडली होती. एप्रिल महिन्यापासून ही घटनेबाबत संस्थेत अंतर्गत चौकशी सुरू होती,

मागील ११ वर्षांपासून या संस्थेत भास्कर आपली पत्नी वैशाली गायकवाड (निरगुट्टी) यांच्यासह काम करीत आहेत .वैशाली या संस्थेच्या अधीक्षका या पदावर कार्यरत असून भास्कर हा संस्थेच्या लेखा विभागाचा प्रमुख म्हणून काम करीत आहे.संस्थेत पती-पत्नी यांच्याकडे प्रमुख जबाबदारी असल्याने संस्थेत त्यांना सन्मानाची वागणूक होती. भास्कर याने त्याचा फायदा उचलला आहे. त्याच्या या कृत्याचे भांडा फोड झाल्याने सुरवातीला पत्नी वैशाली यांनी याबाबत नकारात्मक भूमिका घेतली होती. संस्थेचे जनरल मॅनेजर आनिल फ्रान्सिस यांनी या बाबत सखोल चौकशी करून या प्रकरणाचा छडा लावल्याने वैशाली यांना हा प्रकार मान्य करणे भाग पडले आहे.

पती-पत्नीला कामावरून काढले

संस्थेने सध्या पती-पत्नीला तत्काळ कामावरून काढून टाकले असून वैशाली यांची संस्था सध्या चौकशी करीत आहे. चौकशीला तिने वेळोवेळी मदत करावी म्हणून अशा स्वरूपाच्या सूचना तिला केल्या आहेत. अशा स्वरूपाची माहिती आणील फ्रान्सिस यांनी बोलताना दिलेली आहे.

### आषाढी एकादशीनिमित्त १५ हजार रोपांचे वाटप

**पुणे । प्रतिनिधी**

आषाढी एकादशी निमित्त बुधवारी (ता. १७) विठ्ठलवाडी येथील विठ्ठल मंदिरात सकाळी दहा वाजल्यापासून १५ हजार रोपांचे वाटप करण्यात येईल. देशी वृक्षांसह औषधी रोपांचेही वाटप होईल. श्री स्वामी बॅग्जचे संचालक राहुल जगताप आणि शांतिनिकेतन सेवा प्रतिष्ठानचे दीपक परदेशी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी डॉ. मिथिला जगताप, नीता जगताप उपस्थित होत्या. मागील २३ वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

## दगडूशेठ ट्रस्ट, सुवर्णयुगतर्फे मूकबधिरांना श्रवणयंत्र वाटप

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आणि सूर्योदय फाउंडेशन, मुंबई व महाट्रान्सको यांच्या संयुक्त विद्यमाने जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत ३२७ मूकबधिर मुले व नागरिकांना श्रवणयंत्र वाटप करण्यात आले.

स. प. महाविद्यालयातील लेडी रमाबाई सभागृहात झालेल्या कार्यक्रमात गायिका अनुराधा पौडवाल प्रमुख पाहुण्या होत्या. ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र परांजपे, उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस हेमंत रासने, मंडळाचे मंगेश सूर्यवंशी, राजा पायमोडे, तुषार रायकर, अमोल चव्हाण, विजय चव्हाण, संतोष रसाळ, सुवर्णयुग सहकारी बँकेचे राहुल चव्हाण आदी उपस्थित होते. सूर्योदय फाउंडेशनच्या माध्यमातून अनुराधा पौडवाल याविषयी जनजागृती करीत आहेत. त्या म्हणाल्या, ''श्रवणदोष असणाऱ्यांना श्रवणयंत्र देणे आवश्यक असले तरी जेव्हा मुलाचा जन्म होतो तेव्हाच ही तपासणी करून आवश्यकतेनुसार उपचार करणे गरजेचे आहे. यासाठी प्रसूती करणाऱ्या डॉक्टरांच्या माध्यमातून जनजागृती करणार आहोत.'' उपक्रमाबाबत ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण म्हणाले, ''ट्रस्ट व फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम होत आहे. आजपर्यंत ४५०० हजार श्रवणयंत्रांचे वाटप झाले आहे. आणखी ११०० गरजूंना वाटप करणे बाकी आहे. इतरही शहरांतही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.''

## गायीचे दूध महागले; विक्री दरात २ रुपयांची वाढ



***पुणे । प्रतिनिधी***

सहकारी व खासगी डेअऱ्यांची शिखर संघटना असलेल्या दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाची पुण्यात शनिवारी (दि.१३) बैठक झाली. यावेळी गायीच्या दुधाच्या विक्री दरात लिटरला २ रुपये दरवाढ करण्याचा निर्णय झाला. त्यामुळे हा दर आता प्रति लिटरला ५४ वरून ५६ रुपये झाला आहे. आजपासून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल, असे कल्याणकारी संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांनी सांगितले.

गाईच्या दुधाच्या विक्री दरांमध्ये लीटर मागे दोन रुपये वाढ करण्याचा निर्णय झाला असून म्हशीच्या दुधाच्या विक्री दरांमध्ये कोणतीही वाढ नसल्याची माहिती दूध संघाचे मानद सचिव प्रकाश कुतवळ आणि संगमनेर तालुका दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह देशमुख. कात्रज दूध संघाचे सचिव मनोज लिमये यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दूध संघ गायीच्या दुधाची खरेदी प्रति लिटरला २७ रुपये दराने करीत होते. राज्य सरकारने दूध अनुदान योजना जाहीर करताना हा दर तीन रुपयांनी वाढवून लिटरला ३० रुपये घोषित केला. आणि असा दर देणाऱ्या दूध संघांच्या शेतकऱ्यांना बँक खात्यावर थेट पाच रुपये अनुदान देण्याची घोषणा केली. त्यामुळे शेतकऱ्यांना लिटरला ३५ रुपये मिळणार आहे. राज्य सरकारने दुध उत्पादक शेतकऱ्यांना खरेदी दरात तीन रुपये वाढ केल्याने डेअरी व्यवसायिकांनी गाईच्या दुधाच्या विक्री दरांमध्ये दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## रंगभाषा अन् स्वरभाषेचा अनोखा संवाद

### पंडित मिलिंद तुळाणकर यांच्या जलतरंगाच्या सुरावटीवर मिलिंद मुळीक यांनी साकारली चित्रकृती

**पुणे । प्रतिनिधी**

जलतरंग वादनातून मधुवंती रागाच्या छटा उलगडत असतानाच कॅन्व्हासवर जलरंगांची झालेली आल्हाददायक उधळण यातून रसिक अनोखा कलाविष्कार अनुभवत रंग-तरंगांच्या निर्गुण नात्याचे साक्षीदार झाले. निमित्त होते 'जलरंग व जलतरंग' या विशेष कार्यक्रमाचे.

'कास्प' या अशासकीय संस्थेतर्फे सुप्रसिद्ध चित्रकार मिलिंद मुळीक यांच्या चित्रांच्या प्रदर्शनीचे यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातील कलादालनात भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन आज (दि. १३) झाले. त्या वेळी रसिकांनी ही अनोखी अनुभूती घेतली. प्रदर्शन रविवारीही (दि. १४) सर्वांसाठी खुले आहे. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून चित्रकार मिलिंद मुळीक यांनी 'कास्प'ला भेट दिलेल्या चित्रांचा या प्रदर्शनात



**'कास्प' आयोजित मिलिंद मुळीक यांच्या चित्र प्रदर्शनीला सुरुवात**

समावेश आहे. बेलराईज इंडस्ट्रिजच्या कार्यकारी संचालिका सुप्रिया बडवे यांच्या हस्ते प्रदर्शनीचे उद्घाटन झाले. खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, 'कास्प'चे अध्यक्ष, माजी पोलीस महासंचालक जयंत उमराणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जलतरंग वादक मिलिंद तुळाणकर यांनी कार्यक्रमाच्या वेळेनुरूप मधुवंती राग जलतरंग वादनासाठी निवडून त्यातील आलाप, जोड, झाला प्रस्तुत केला. त्याच वेळी चित्रकार मिलिंद मुळीक यांनी आपल्या कुंचल्यांमधून विविध रंगछटा साकारत अतिशय सुंदर अशा निसर्गचित्राची निर्मिती केली. काळाच्या पडद्यावर उमटणारे जलतरंगाचे सूर आणि अवकाशाच्या पटलावर साकारलेल्या रंगछटा यातून सूर आणि रंगातील निर्गुण नाते शोधण्याचा अनोखा आविष्कार रसिकांना मोहित करून गेला. या उपक्रमास पुणेकर रसिकांनी भरभरून दाद देत कलाविष्कार अनुभवला.

सुरुवातीस जयंत उमराणीकर यांनी 'कास्प'च्या उपक्रमांची माहिती दिली. संस्थेच्या उपक्रमांना समाजाकडून भरभरून सहकार्य मिळावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केले.

उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना सुप्रिया बडवे म्हणाले, कलेच्या माध्यमातून शब्दांशिवाय संवाद साधता येतो यामुळेच कलेचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. नैराश्येच्या गर्तेत जाणाऱ्या युवा पिढीला कलेच्या माध्यमातून उभारी मिळू शकेल.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी 'कास्प'च्या कार्याविषयी बोलताना म्हणाल्या, एखादी संस्था सातत्याने कार्यरत असण्यासाठी आर्थिक पाठबळाची आवश्यकता असते. संस्थेला शासकीय स्तरावर मदत मिळवून देण्याचा आपला प्रयत्न राहिल, अशी ग्वाही त्यांनी दिली. रंगछटा आणि स्वराविष्कार याविषयी मिलिंद मुळीक आणि पंडित मिलिंद तुळाणकर यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत जयंत उमराणीकर, अंजली राजे यांनी केले. सूत्रसंचालन ऋतुजा फुलकर यांनी केले तर आभार संस्थेचे संचालक डॉ. सचिन बोधनी यांनी मानले.

## विश्रांती घेतलेल्या पावसाची पुन्हा तुफान बॅटिंग सुरु; लोणावळ्यात अवघ्या ९ तासात ७३ मिमी पावसाची नोंद

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याच्या अनेक भागात पावसाने पुन्हा एकदा जोरदार सुरूवात केली आहे. पुणे शहर परिसरात देखील पावसाने जोरदार हजेरी लावली. लोणावळा परिसरात आज पावसाने तुफान बॅटिंग सुरु केली आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान लोणावळा परिसरात ७३ मिलीमीटर पाऊस बरसला आहे. या मोसमातील ही उच्चांकी नोंद ठरलेली आहे. गेल्या रविवार पासून पावसाने मोठी विश्रांती घेतली होती.

पावसाने जोर वाढवला आहे. काल सकाळी ८ ते आज सकाळच्या ८ या २४ तासांत ९२ मिलीमीटर पाऊस कोसळला होता. मात्र, आज सकाळी पावसाने रौद्ररूप धारण केल्याचं दिसून आलं, अवघ्या नऊ तासांत ७३ मिलीमीटर बरसत, यंदाच्या मोसमातील उच्चांकी पावसाची नोंद झाली आहे. या मोसमात आत्तापर्यंत




१३४२ मिलीमीटर पाऊस बरसला आहे.

गेली आठवडाभर ओढ देणारा पाऊस कालपासून पर्यटननगरी लोणावळ्यात(डेपरींश्रर) बरसू लागला आहे. त्यानंतर वर्षाविहारासाठी शहर परिसरात असलेले धबधबे आणि लोणावळा परिसरात पर्यटकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर वाढू लागली आहे. यामुळे विक एंडला या भागात मोठ्या पर्यटक येत आहेत. पुणे शहर परिसरात पावसाचा इशारा

पुणे शहर परिसरासह घाटमाथ्यावरील काही भागात आजपासून पुढील तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून (खचऊ) वर्तवण्यात आला आहे. शनिवारी आणि रविवारी घाटमाथ्यावर वर्षाविहारासाठी जाणाऱ्या पर्यटकांनी काळजी घ्यावी असं आवाहन देखील करण्यात आलं आहे.